सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित


छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि.५ मे २०२६ | वर्ष - ४ थे | अंक २१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## आज पुण्यात व्यंगचित्र प्रदर्शन

**पुणे:** शिवसेनाप्रमुख आणि ज्येष्ठ व्यंग्यचित्रकार स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवनातील विविध पैलू 'आमचेही फटकारे' या चित्र, अर्कचित्र आणि व्यंगचित्र प्रदर्शनातून उलगडणार आहेत. जागतिक व्यंग्यचित्रकार दिन हा ५ मे रोजी साजरा केला जाणार आहे.

यानिमित्ताने कार्टून्स कट्टा, महाराष्ट्र व्यंग्यचित्रकार ग्राप आणि महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने मंगळवारी (दि. ५) आणि बुधवारी (दि.६) आयोजित या प्रदर्शनातून ठाकरे यांच्यावरील चित्रे, अर्कचित्रे रसिकांना पाहायला मिळणार आहेत.हे प्रदर्शन जंगली महाराज रस्त्यावरील बालगंधर्व कलादालनात सकाळी अकरा ते रात्री आठ या वेळेत आयोजित केले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन मंगळवारी (दि. ५) सकाळी अकरा वाजता ज्येष्ठ कवी, वात्रटिकाकार रामदास फुटाणे यांच्या हस्ते होणार आहे. प्रदर्शनात १२० चित्रकारांनी रेखाटलेली ठाकरे यांच्यावरील निवडक २०० चित्रे व अर्कचित्रे पाहायला मिळतील.

## तामिळनाडूत थलपतींच्या 'टीव्हीके' चा धमाका



**वृत्तसंस्था**

**चेन्नई :** राजकारणात काहीही होऊ शकतं असं नेहमी म्हटलं जातं, त्याचा प्रत्यय आज साक्षात खरा होतो आहे. तामिळनाडूमधील निकाल समोर येत आहेत. २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत अभिनेता विजय याचा पक्ष एवढी मोठी मुसंडी मारेल याचा अंदाज वर्तवण कुणालाही अशक्य होतं. पण एका व्यक्तीने तो वर्षभरापूर्वी वर्तवला होता. होय, विजय थलापतीची राजकीय एन्ट्रीही धमाकक्यात झाली आहे. त्याला कोणीही गांभिर्याने घेतलं नव्हत. दीडवर्षांपूर्वी सुरुवात केलेल्या विजयच्या टीव्हीकेने तगडी आघाडी घेतली आहे.

'तमिळगा वेत्री कळघम' (ढतघ) या विजयच्या पक्षाची ताकद एवढी असेल असा कोणालाही अंदाज नव्हता. एक्झिट पोल्समध्ये एका पोलमध्ये विजयला ९८ ते १२० जागा जिंकण्याचा अंदाज दिला होता, तेव्हा त्यावर टीका झाल्याचेही पाहायला मिळाले होते. पडद्यावरचा हिरो राजकारणात काय करणार असा प्रश्न विचारला जात होता. मात्र आज जसे निकालांचे कल हाती येत गेले तसे सर्व टीकाकारांना पक्षाच्या परफॉर्मन्सने चोख असे उत्तर दिले आहे.

दुपारी ३ वाजेपर्यंतच्या कलांनुसार आता विजयचा पक्ष टीव्हीके हा तब्बल १२१ जागांवर आघाडी घेताना दिसतो आहे. विशेष म्हणजे एम. के. स्टालिन यांच्या नेतृत्वाखालील ऊ्वघ ला पुन्हा सत्ता मिळेल हा सर्व एक्झिट पोल्सचा अंदाज तमिळ जनतेने धुळीस मिळवला आहे.

या ऐतिहासिक कलांनंतर राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर (पीके) यांनी एक वर्षभरापूर्वी वर्तवलेली भविष्यवाणी आता व्हायरल होत आहे. त्यांनी मार्च २०२४ मध्ये एका मुलाखतीत ठामपणे सांगितले होते की, जर विजय स्वबळावर लढले तर ते तमिळनाडू जिंकतील, आणि आताचं चित्र तसंच आहे.

# बंगालमध्ये पहिल्यांदाच 'कमळ' फुललं

**वृत्तसंस्था**

**कोलकाता :** देशात सर्वाधिक लक्ष लागलेल्या पश्चिम बंगालच्या निकालाचं चित्र आता स्पष्ट होत असून बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जींच्या टीएमसी पार्टीला मोठा धक्का बसला आहे. बंगालमध्ये आता नवा इतिहास लिहिला जातो आहे. बंगालने भाजपला संधी देत नवा अध्यायाची सुरुवात केली आहे. गेली १५ वर्षे सत्तेत असलेल्या ममता दीदी यांच्या तृणमूल काँग्रेसला यंदा मतदारांनी नाकारल्याचं चित्र असून भाजप पहिल्यांदाच याठिकाणी सत्तेत येत आहे. बीजेपीने बंगालमध्ये बहुमताचा टप्पा ओलांडला आहे. १९० पार करत भाजपचा राज्यात मोठा विजय होताना दिसतो आहे. मतदारांचा हा कल म्हणजे ममता दीदींच्या राजकारणाला मोठा धक्का मानला जातो आहे.



या अनपेक्षित निकालांमागची कारणे तरी काय हा प्रश्न तुम्हालाही पडला असेल, कारण गेली १५ वर्षे सत्तेचा डोलारा मिरवणाऱ्या टीएमसीला एवढ्या मोठ्या फरकाने पराभवाचा सामना करावा लागेल असं कोणालाही वाटलं नसेल पण आता मात्र नंबर पाहता सत्तेचा हा सारिपाट भाजपच्या बाजून गेला आहे.

पहिल्या कारणाकडे पाहताना राजकीय विश्लेषकांच्या मते यंदाच्या निवडणुकीमध्ये भ्रष्टाचार हा मुद्दा कळीचा ठरला. शिक्षक भरती घोटाळ्यातील आरोपांनी टीएमसीची प्रतिमा मलिन झाली होती. ममता बॅनर्जी यांनी 'लक्ष्मीर भंडार' आणि 'कन्याश्री' सारख्या योजनांच्या माध्यमातून महिला मतदारांना टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला होता पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यामागचं कारण म्हणजे सुशिक्षित तरुणांमधील बेरोजगारीचा रोष. हा रोष सरकारी योजनांच्या लाभापेक्षा भारी ठरल्याचे आतपर्यंतच्या निकालांच्या कलांवरुन स्पष्ट होत आहे.

ममता दीदी या गेली तीन टर्म सत्तेत होत्या. त्यामुळे सरकारमध्ये असूनही अपेक्षित असे विकासाचे परिणाम न दिसल्याने मतदार नाराज होतेच. खासकरुन ग्रामीण भागातल्या नागरिकांच्या समस्या हा मुख्य मुद्दा होता. याठिकाणी 'सिंडिकेट राज' आणि स्थानिक नेत्यांच्या मनमानीबद्दल वारंवार तक्रारी येत होत्या. ममता दीदी या वैयक्तिकरित्या आजही लोकप्रिय आहेत पण त्यांच्या पक्षातल्या स्थानिक राजकारणाच्या फळी सांभाळणाऱ्यांकडून मात्र त्या तक्रारींचे निवारण करणे शक्य झाले नाही, अशीही चर्चा होती, ज्याचा फायदा भाजपने घेतला.



ममता बॅनर्जींनी त्यांच्या सत्तेच्या काळात शेतकरीस कष्टकरी वर्गांसाठी अनेक निर्णय घेतले. पण बंगालमध्ये कोणतेही मोठे उद्योग आणि व्यवसाय आणण्यात त्यांना यश आले नाही, ज्यामुळे रोजगाराचा प्रश्न प्रलंबित राहिला. भाजपने त्यांचा प्रचाराचा जोर याच बाजूने लावला. सोनार बांगला आणि औद्योगिक विकासाच्या मुद्द्यावर केलेल्या प्रचारामुळे शहर आणि निमशहरी भागातला मतदार हा भाजपच्या बाजूने गेला. टीएमसी ही कामाचा पाढा वाचत राहिली आणि दुसरीकडे भाजपने मतदारांना विकासाचे पर्व दाखवून बाजी मारली असे या निकालाच्या कलांचे विश्लेषण अनेकांनी केले आहे.

निवडणूक आयोगाची भूमिकाही या निवडणुकीत महत्त्वाची ठरली आहे. मतदार याद्यांमधील दुरुस्ती असेल किवा बोगस मतदारांची नावे काढून टाकल्यामुळे मतदानाची पारदर्शकता वाढली होती. टीएमसीने या सगळ्याला भाजपचे षडयंत्र म्हटले होते. पण निष्पक्ष मतदानामुळे मतांची टक्केवारी आणि सगळीच समीकरणं बददली, असेही काही तज्ज्ञांनी सांगितले.

## पेट्रोल-डिझेल दर अद्याप स्थिर

**मुंबई :** सोमवार ४ मे रोजी पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर होत असताना पेट्रोल आणि डिझेलच्या दरांबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. सध्या तरी तेल कंपन्यांनी इंधन दरात कोणताही बदल केलेला नाही, त्यामुळे वाहनधारकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. म्हणजेच, आज पेट्रोल-डिझेल भरणाऱ्यांना जुन्याच दराने पैसे मोजावे लागणार आहेत.

दरम्यान, निवडणुकीनंतर इंधन दर वाढणार का, हा प्रश्न अनेकांच्या मनात आहे. त्यामुळे वाहनधारकांनी आपल्या शहरातील आजचे दर जाणून घेणे आणि पुढील घडामोडींवर लक्ष ठेवणे महत्त्वाचे ठरणार आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती मात्र वाढताना दिसत आहेत. ब्रेंट क्रूड सुमारे १०८.३० डॉलर प्रति बॅरलवर स्थिर आहे, तर यूएस क्रूड १०२ डॉलरच्या आसपास व्यवहार करत आहे. या वाढत्या दरांचा परिणाम देशांतर्गत इंधन दरांवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. (PETROL - DIESEL PRICE)

सूत्रांच्या माहितीनुसार, येत्या काही दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत प्रति लिटर ४ ते ५ रुपयांनी वाढ होऊ शकते. एलपीजी सिलेंडरही महाग होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गेल्या काही वर्षांपासून किरकोळ दर स्थिर ठेवले असले तरी, वाढत्या कच्च्या तेलाच्या किमतीमुळे तेल कंपन्यांवर आर्थिक ताण वाढत असल्याचे सांगितले जात आहे.

# केरळमध्ये 'सत्तापालट'

**वृत्तसंस्था**

**तिरुअनंतपुरम : केरळ विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील 'संयुक्त लोकशाही आघाडी'ने (णऊ्र) मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांची दशकभराची सत्ता उलथवून टाकत दणदणीत विजय मिळवला आहे. डाव्या लोकशाही आघाडीच्या (डऊ्र) बालेकिल्ल्याला सुरुंग लावत णऊ्र ने राज्याच्या राजकारणात सत्तापालट केले आहे. आतापर्यंत समोर आलेल्या आकडेवारीनुसार, विधानसभेच्या एकूण १४० जागांपैकी णऊ्र तब्बल १०० जागांवर आघाडीवर असून बहुमताचा आकडा (७१) सहज पार केला आहे. दुसरीकडे, सत्ताधारी डऊ्र केवळ ३४ जागांवर आघाडीवर आहे. भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएला मात्र केवळ ३ जागांवर आघाडी घेतली आहे. दोन जागांवर छऊ- आघाडीवरकेरळमध्ये छऊ- दोन जागांवर आघाडीवर आहे. नेमम मतदारसंघात, माजी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष राजीव चंद्रशेखर हे उझख(च्) चे ज्येष्ठ नेते व्ही. शिवनकुट्टी आणि काँग्रेसचे के.एस. सबरिनाधन यांच्या विरोधात आघाडीवर आहेत. तर, चथन्नूर मतदारसंघात, भाजपचे बी.बी. गोपाकुमार हे उझख चे आर. राजेंद्रन आणि काँग्रेसचे सूरज रवी यांच्या विरोधात आघाडीवर आहेत.काँग्रेसच्या उषा विजयन या मनंतवाडी मतदारसंघातून ६६,२३७ मतांसह आघाडीवर आहेत. १७ पैकी १५ फेऱ्यांमध्ये त्यांनी ७,९३२ मतांची आघाडी कायम राखली असून, काँग्रेसची या मतदारसंघावर असलेली भक्कम पकड असल्याचे स्पष्ट झाले आहे.काँग्रेस आमदार चंडी ओमन यांनी आपला बालेकिल्ला असलेल्या पुथुपल्ली मतदारसंघावर ५२,९०७ मतांच्या निर्णायक फरकाने पुन्हा एकदा वर्चस्व प्रस्थापित केले. ते केरळचे माजी मुख्यमंत्री ओमन चंडी यांचे सुपुत्र आहेत. चंडी यांना ८४,०३१ मते मिळाली, तर उझख(च्) चे उमेदवार के. एम. राधाकृष्णन यांना ३१,१२४ मते मिळाली.काँग्रेस नेते रमेश चेन्निथला यांनी हरिपाद विधानसभा मतदारसंघातून २३,३७७ मतांच्या फरकाने विजय मिळवला.**

## एम. के. स्टालिन यांचा पराभव

**चेन्नई : तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टालिन यांचा विधानसभा निवडणुकीत धक्कादायक पराभव झाला आहे. कोलाथूर मतदारसंघातून टीव्हीके (ढतघ) पक्षाचे उमेदवार व्ही. एस. बाबू यांनी त्यांना धूळ चारली आहे. निवडणूक आयोगाच्या अधिकृत वेबसाईटनुसार, मतमोजणीच्या सहाव्या फेरीपासूनच व्ही. एस. बाबू यांनी मुख्यमंत्री स्टालिन यांच्यावर आघाडी घेतली होती.**

# बारामतीत सुनेत्रा पवारांचा विक्रमी विजय

## २.१८ लाख मताधिक्याने देशात नवा इतिहास

**तभा वृत्तसेवा**

**बारामती :** उत्तर प्रदेशातील साहिबाबाद मतदार संघातून २०२२ साली विजयी झालेल्या सुनील कुमार शर्मा यांच्या नावे २ लाख १४ हजार ८३५ एवढ्या विक्रमी मताधिक्याची नोंद देशात होती. ती मोडीत काढत २ लाख १८ हजार ९३० मतांनी बारामती विधानसभा पोटनिवडणूकीत महायुतीच्या उमेदवार व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विजय मिळविला.

बारामतीच्या पोटनिवडणूकीत मतांचा विक्रम प्रस्थापित करावा असे आवाहन खुद्द मुख्यंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बारामतीत प्रचार सांगता सभेत केले होते. बारामतीकरांनी ते मनावर घेत देशातील सर्व विक्रम मोडीत काढत नवा विक्रम प्रस्थापित केला. बारामतीच्या पोटनिवडणूकीसाठी ५८.१७ टक्के मतदान झाले होते. एकूण ३ लाख ८४ हजार ५७९ मतदारांपैकी २ लाख २३ हजार



७०५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. सोमवारी (दि. ४) बारामती एमआयडीसीतील राज्य वखार महामंडळाच्या गोदामात सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. पहिल्या फेरीपासूनच पवार यांनी त्यात प्रचंड आघाडी घेतली. फेरीनिहाय त्यांची आघाडी वाढतच गेली.

१८ व्या फेरीतच त्यांनी २०१९ साली अजितदादांनी येथे प्रस्थापित केलेला १ लाख ६५ हजार २६५ मतांचा विक्रम मोडला. त्यानंतरच्या पुढील प्रत्येक फेरीत त्यांचे मताधिक्य वाढतच गेले. २० नोव्हेंबर २०२४ रोजी पार पडलेल्या पंचवार्षिक निवडणूकीत बारामतीत ७१.२७ टक्के मतदान झाले होते. पवार विरुद्ध पवार अशी लढत झाली होती. त्यावेळी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अजितदादा पवार यांना ईव्हीएम व पोस्टल अशी १ लाख ८१ हजार १३२ तर युगेंद्र पवार यांना ८० हजार २३३ मते मिळाली होती.

१ लाख ९०९ मतांनी अजितदादा पवार विजयी झाले होते. अजितदादा यांच्या अकाली निधनानंतर लागलेली पोटनिवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न झाला. परंतु अपक्ष व काही छोट्या पक्षांमुळे तो असफल ठरला. सुनेत्रा पवार यांच्या विरोधात २२ उमेदवार निवडणूक रिंगणात राहिले. परंतु त्या सर्वांचे डिपॉझिट जप्त झाले.

## राहुरीत अक्षय कर्डिलेंचा विक्रमी मताधिक्याने विजय



**तभा वृत्तसेवा**

अहिल्यानगर : राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी १ लाख, १२ हजार ५८७ मताधिक्याने दणदणीत विजय मिळवला आहे. राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे निधनानंतर ही पोट निवडणूक लागली होती. या निवडणुकीत शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांना १ लाख ४० हजार ९३ मते तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार गोविंद मोकाटे यांना २७ हजार ५०६ मते मिळाली. मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच अक्षय कर्डिले यांनी एकतर्फी आघाडी घेतली होती. प्रत्येक फेरीत वाढत गेलेली आघाडी पाहता निकालाची औपचारिक घोषणा होण्यापूर्वीच त्यांचा विजय निश्चित मानला जात होता. अखेरीस मोठ्या फरकाने त्यांनी पोटनिवडणुकीत बाजी मारत राहुरीतील राजकारणात भाजपचा झेंडा पुन्हा फडकवला आहे.

राहुरी पोटनिवडणुकीत प्राजक्त तनपुरे यांनी घेतलेला माघारीचा निर्णय टर्निंग पॉइंट ठरला. सुरुवातीला तनपुरे निवडणूक लढवणार असल्याची जोरदार चर्चा होती. मात्र अचानक भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी थेट तनपुरे यांच्या कार्यालयात जाऊन त्यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी निवडणूक न लढवायचा निर्णय घेतला आणि राजकीय समीकरणे झपाट्याने बदलली. या चर्चेनंतर तनपुरे यांनी राहुरीच्या विकासासाठी एक पाऊल मागे घेत आहे असे सांगत निवडणूक न लढवण्याचा निर्णय जाहीर केला.

तनपुरे यांच्या माघारीनंतर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासमोर उमेदवाराचा प्रश्न निर्माण झाला. शेवटच्या क्षणी पंचायत समितीचे माजी सदस्य गोविंद मोकाटे यांना उमेदवारी देण्यात आली. मात्र अचानक मिळालेल्या संधीमुळे त्यांना प्रभावी प्रचार यंत्रणा उभारता आला नाही आणि त्याचा परिणाम थेट निकालावर दिसून आला. त्यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव झाला.

## रेल्वे कर्मचाऱ्यांचा लाभ

**मुंबई :** रेल्वेतील तांत्रिक कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या इंडियन रेल्वे टेक्निकल सुपरवायझर्स असोसिएशनने आठव्या वेतन आयोगासमोर आपल्या मागण्या मांडल्या आहेत. त्यांनी कर्मचाऱ्यांच्या विविध स्तरांसाठी पाच-स्तरीय फिटमेंट फॅक्टर, ५% वार्षिक वेतनवाढ आणि दोन वार्षिक वेतनवाढींइतकी पदोन्नती वेतनवाढ यांची मागणी केली आहे. आपल्या निवेदनात, खठढड- ने कर्मचाऱ्यांच्या विविध स्तरांसाठी पाच फिटमेंट फॅक्टरपर्यंतची मागणी केली आहे.

आठव्या वेतन आयोगाला एक निवेदन सादर करून किमान मूळ वेतन ५२,६०० रुपयांपर्यंत वाढवण्याची मागणी केली आहे. रेल्वेमधील तांत्रिक पर्यवेक्षकांच्या श्रेणीसाठी उझडए (जछञ्रछ) प्रमाणे पाच-श्रेणी वेतन संरचना उपलब्ध असावी. खठढड- ने म्हटले आहे की, तंत्रज्ञांचे, विशेषतः रेल्वेमध्ये काम करणाऱ्यांचे वेतन, इतर कर्मचाऱ्यांपेक्षा वेगळे निश्चित केले पाहिजे,

## महिनाभरात शेतकरी कर्जमाफीचा निर्णय : दत्तात्रय भरणे

**तभा वृत्तसेवा**



**पुणे :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत दिलासादायक बातमी समोर येत आहे. पुढच्या एका महिन्याच्या आत कर्जमाफीचा मोठा निर्णय घेतला जाणार असून, खुद्द मुख्यमंत्री याची घोषणा करतील, अशी महत्त्वाची माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. तसेच कृषी विभागाच्या योजना घराघरात पोहोचवण्यासाठी आता 'शेतकरी मित्र' ही नवी संकल्पना राबवण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पेरणी पुर्व कृषी आढावा बैठकीनंतर ते बोलत होते.

गेल्या अनेक दिवसांपासून शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयाकडे डोळे लावून बसले होते. याबाबत माहिती देताना मंत्री भरणे म्हणाले की, कर्जमाफीबाबतची सर्व तांत्रिक माहिती गोळा करण्याचे काम पूर्ण झाले आहे. एका महिन्याच्या आत यावर अंतिम शिक्कामोर्तब होईल. यामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. याशिवाय, मागील दोन महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाची मदतही संबंधित शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील कृषी सहाय्यकांच्या मदतीसाठी आणि तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'शेतकरी मित्र' योजना सुरू करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत संपूर्ण राज्यात ११ हजार शेतकरी मित्रांची नियुक्ती केली जाईल. जिल्हास्तरावर निवड प्रक्रिया पार पाडून या नियुक्त्या केल्या जातील. या माध्यमातून ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना हक्काचा रोजगार मिळेल आणि शेतकऱ्यांना सरकारी योजनांची माहिती वेळेत उपलब्ध होईल.

वातावरणातील बदलांमुळे उद्भवणाऱ्या 'एल-निनो'च्या संकटाचा सामना करण्यासाठी कृषी विभागाने कंबर कसली आहे. मंत्री भरणे यांनी आज अधिकाऱ्यांची विशेष कार्यशाळा घेऊन खरीप हंगामाचे नियोजन केले. येत्या काळात चारा आणि खतांचा तुटवडा भासू नये, यासाठी कृषी अधिकाऱ्यांनी कार्यालयात न बसता थेट शेतकऱ्यांच्या बांधावर (फिल्डवर) जाऊन मार्गदर्शन करावे, असे कडक निर्देश त्यांनी दिले आहेत.

# नवी मुंबई विमानतळ आंतरराष्ट्रीय उड्डाणासाठी सज्ज

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** मे महिन्यापासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून विमान सेवेचा विस्तार होणार आहे. विमानतळावरून मे २०२६पासून आंतरराष्ट्रीय उड्डाणांना सुरूवात होत असल्यामुळे उड्डाणांची आणि प्रवाशांची संख्या वाढणार आहे.

सिडकोचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या मते, यशस्वी देशांतर्गत सेवांनानंतर आता नवी मुंबई विमानतळ आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठीही सज्ज झालं आहे.मात्र,अद्यापअधिकृत घोषणा करणे बाकी आहे. ३५ उड्डाणांची शक्यता यापूर्वी २९ मार्चपासून नवी मुंबई विमानतळावरून आंतरराष्ट्रीय उड्डाणांना सुरूवात होणार असल्याची घोषणा केली होती. पण पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षामुळे ही योजना पुढे ढकलण्यात आली होती.




मग त्यानंतर पुन्हा मे महिन्यात आंतरराष्ट्रीय ऑपरेशन्सची सुरूवात होणार असे सिडकोने जाहीर केले. यामुळे येत्या महिन्याभरात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून दररोज सुमारे ३५ आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुरू होण्याची शक्यता आहे. अद्याप यासाठी तारीख जाहीर केली नाही आहे.

डिसेंबर २०२५पासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाणांना सुरूवात झाली. तेव्हा केवळ देशांतर्गत सेवांना सुरूवात करण्यात आली होती. हळूहळू सेवांचा विस्तार होत असून विमानतळाच्या आजूबाजूने पायाभूत सुविधांचा विकाससुद्धा आता सुरू आहे.

सध्या विमानतळावर केवळ एक धावपट्टी कार्यरत असल्यामुळे विमान उड्डाणांची संख्या मर्यादीत असू शकते. पण दुसऱ्या धावपट्टीचंही काम आता वेगाने सुरू आहे. पहिल्या काही महिन्यातील प्रतिसाद लक्षात घेता दुसऱ्या धावपट्टीचं काम सुद्धा सुरू केलं आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जागतिक पशुवैद्यक दिनानिमित्त परिसंवाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ मे :** जागतिक पशुवैद्यक दिनानिमित्त हॉटेल अंजनी येथे पशुसंवर्धन विभाग व एमएसडी यांच्या वतीने 'पशुवैद्यकः अन्न सुरक्षा व सार्वजनिक आरोग्याचे रक्षक' या विषयावर जिल्हास्तरीय तांत्रिक परिसंवादाचे आयोजन केले होते.

परिसंवादाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. अनिल भिकाने, प्रादेशिक सहआयुक्त डॉ. नाना सोनवणे, डॉ. शिवशंकर उस्तुरगे, डॉ. भास्कर बोरगावकर उपस्थित होते. पशुपालकांना वेळेवर उपचार, रोगप्रतिबंधक लसीकरण आणि आधुनिक पशुपालन व्यवस्थापन यावर भर देण्यासह पशुपालकांना उद्योजकतेकडे वळविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. श्र्वानांचे निर्बीजीकरण करून लातूर जिल्हा रेबीजमुक्त करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी केले. यावेळी पशुवैद्यकांचा सन्मान केला. यात डॉ. श्रीधर शिंदे, डॉ. विजय जाधव, डॉ. नेताजी शिंगटे, डॉ. राम हुडगे, डॉ. वसंत गुळवे, डॉ. सूर्यकांत नागरगोजे, डॉ. मधुकर बोरूळे, डॉ. धीरज मानकरी, डॉ. महादेव जगताप यांचा समावेश होता. प्रास्ताविक उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. श्रीधर शिंदे, डॉ. समीर सास्तुरकर यांनी तर आभार डॉ. सुधाकर साळवे यांनी मानले. यावेळी जिल्ह्यातील १५० हून अधिक पशुवैद्यकीय अधिकारी, प्राध्यापक, उद्योजक व पशुपालक उपस्थित होते.



## विविध वृत्त...

### अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीबाबत आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ मे :** येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे सन २०१६ ते २०२० या वित्तीय वर्षात प्रवेशित अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम समाज कल्याण विभागाकडून मंजूर झाली आहे. परंतु, संबंधित प्रशिक्षणार्थ्यांचे बँक खाते क्रमांक, आयएफएससी कोड आणि मोबाईल क्रमांक उपलब्ध नसल्याने शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या खात्यावर जमा होऊ शकलेली नाही.

तरी सन २०१६ ते २०२० या कालावधीतील पात्र विद्यार्थ्यांनी आपले सध्या सुरू असलेले बँक खाते क्रमांक, आयएफएससी कोड, मोबाईल क्रमांक, आधार कार्ड, पॅन कार्ड आणि ओळखीचा इतर पुरावा घेऊन २० मे २०२६ पर्यंत संस्थेत प्रत्यक्ष उपस्थित राहावे व आपली शिष्यवृत्तीची रक्कम रोखा विभागाकडून प्राप्त करून घ्यावी. जे विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित राहू शकत नाहीत, त्यांनी आपले सर्व आवश्यक कागदपत्रे संस्थेच्या श्रींीiळींळूरहे.लो या ईमेलवर पाठवावीत. विहित मुदतीत कागदपत्रे सादर न केल्यास शिष्यवृत्तीची रक्कम वाटप न करता ती शासनास जमा केली जाईल, असे लातूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य संजय माळकुंजे यांनी कळविले आहे.

### ९ मे रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ मे :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि सर्वोच्च न्यायालय यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा व सत्र न्यायालय, तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये शनिवार, ९ मे २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या लोकअदालतीमध्ये प्रलंबित तडजोडीस पात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे, नेगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट (कलम १३८) अंतर्गत धनादेश अनादर प्रकरणे, भूसंपादन, कौटुंबिक वाद आणि मोटार वाहन अपघात दावा प्रकरणे, दरखास्त प्रकरणे व कामगार/औद्योगिक न्यायालयातील प्रकरणे, बँकेशी संबंधित प्रलंबित प्रकरणे तसेच बँक तथा वित्तीय संस्थांची वाद पूर्व प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

लोकअदालतीमध्ये दोन्ही पक्षांना आपली बाजू मांडण्याची समान संधी मिळते. आपापसातील संमतीने तडजोड होत असल्याने दोन्ही पक्षांचा वेळ आणि पैसा वाचतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, प्रकरण आपापसातील संमतीने निकाली निघाल्यास भरलेले न्यायालयीन शुल्क परत मिळते. या लोकअदालतीमध्ये पक्षकार आणि विधीज्ञांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आपली प्रकरणे तडजोडीने निकाली काढावीत, असे आवाहन लातूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष संजय भारुका तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही. एन. गिरवलकर यांनी केले आहे.

## संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तत्पर कार्यवाही करावी: आ. संभाजी पाटील निलंगेकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ मे :** उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असून मे महिन्यातही तापमान मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. परिणामी निलंगा मतदारसंघात पाणीटंचाई उद्भवण्याची शक्यता असून मतदारसंघातील एकाही गावाला पाणी टंचाई भासणार नाही याची खबरदारी घेवून पाणीटंचाईच्या पार्श्र्वभूमीवर प्रशासनाने तत्पर कार्यवाही करावी, अशी सूचना माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली आहे.

लातूर येथील शासकीय विश्रामगृहात माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाजयांच्या उपस्थितीत पाणी टंचाई आढवा बैठक घेतली. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील, निलंगा तहसिलदार प्रसाद कुलकर्णी, शिरुर अनंतपाळ तहसिलदार किशोर यादव, देवणी तहसिलदार सोमनाथ वाडकर यांच्यासह शिरुर अनंतपाळ पंचायत समितीचे सभापती संजय सूर्यवंशी, निलंगा पंचायत समिती सभापती सुनिता वाघमारे, देवणी पंचायत समिती सभापती अंकिता पाटील, निलंगा नगराध्यक्ष संजयराज हलगरकर, शिरुर अनंतपाळ नगराध्यक्ष रतन शिवणे आदींसह प्रशासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधींची उपस्थिती होती.



लातूर जिल्हा पाणीटंचाईग्रस्त म्हणून ओळखला जात असला तरी पाणीटंचाईचा हा काळा पुसण्याचा प्रामाणिक प्रयत्न सातत्याने महायुती सरकारकडून होत असल्याचे सांगून माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी निलंगा विधानसभा मतदार संघात पाणीटंचाई फारशी जाणवत नसल्याचे स्पष्ट केले. यापूर्वी निलंगा मतदारसंघात सिंचनाचे व पाणीपुरवठ्याचे काम अतिशय नियोजनबध्द केले असल्यामुळेच हे शक्य झाले असल्याचे सांगितले. मात्र सध्या तापमान मोठ्या प्रमाणात वाढत असून मे महिन्यातही तापमानाचा पारा वाढण्याची शक्यता हवामन खात्याने वर्तविली आहे.त्यामुळे मतदारसंघात पाणीटंचाई उद्भवणार नाही यासाठी प्रशासनाने तात्काळ ठोस पाऊले उचलून नियोजन आराखडा तयार करावा, अशी सूचना देत मतदारसंघातील प्रत्येक गावात सध्या पाण्याची परिस्थिती काय आहे याबाबत माहिती घेवून ज्या ठिकाणी पाणीटंचाई उद्भावणार आहे तेथे कोणत्या उपाययोजना करणे अपेक्षित आहे त्या पूर्ण करून घ्याव्यात, अशाही सूचना आ. निलंगेकर यांनी दिल्या.

प्रत्येक गावातील तलाठी, आणि ग्रामसेवक यांनी वेळोवेळी आढावा घेवून पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाजयाचीही गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी तसेच याबाबत प्रशासनास वेळोवेळी माहिती द्यावी, असे सांगून माजी मंत्री आ. निलंगेकर म्हणाले की, या माहितीच्या आधारे प्रशासनाने गांभीर्याने कार्यवाही करावी अशी सूचना केली. त्याच बरोबर नागरिकांकडून येणाजया पाणीटंचाईसह इतर तक्रारींची वेळीच दखल घेवून त्याबाबत तत्काळ उपाययोजना व्हाव्यात असेही माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी सूचित केले.

## २५ हजार कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करणार



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ मे :** लातूर जिल्ह्यात शिवसेना शिंदे गटात दि. २७ एप्रिल रोजी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थिती मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गटाचे माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील यांनी प्रवेश केल्यानंतर लवकरच २५ हजार कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करणार व गाव तिथे शिव सेनाच्या शाखा काढणार व शिवसेना कार्यकर्त्यांना ताकद देणार असल्याची घोषणा पाटील यांनी लातूर येथे पत्रकार परिषदेत केली.

यावेळी भाजपा युवा मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष ॲड. गणेश गोमचाळ यांनी भूमिका मांडते वेळी युवकांचा शिवसेनेमध्ये प्रवेश करून महानगरपालिका संघटनेची बांधणी करणार असे अश्वस्त केले. उबाठा गटाचे संतोष सोमवंशी यांनी नवनाथ भोसले, संदीप पाटील आदी सह अनेक कार्यकर्तेनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. या वेळी उपस्थित सर्व शिवसेना प्रमुख पदाधिकारी, युवा सेना पदाधिकारी तसेच महिला प्रमुख पदाधिकारी, सामाजिक न्याय विभाग प्रमुख पदाधिकारी, कामगार सेना, वाहतूक सेना, किसान सेना व शेकडो शिवसैनिकांनी, कार्यकर्त्यांनी आजी-माजी व नवीन कार्यकर्त्यांनी जल्लोष यामध्ये विनायक राव पाटील, ॲड. गणेश गोमचाळे, संतोष सोमवंशी, नवनाथ भोसले यांचेही स्वागत व सत्कार केला.

## कै. प्रयागबाई पाटील महाविद्यालयाचे १२ वीच्या परीक्षेत उत्तुंग यश



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ मे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या १२ वीच्या परीक्षेत कै. प्रयागबाई पाटील कनिष्ठ महाविद्यालयाने पुन्हा एकदा आपल्या शैक्षणिक उत्कृष्टतेचा ठसा उमटवला आहे. या वर्षी महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखांचा एकूण ९५ टक्के निकाल नोंदवला गेला आहे.

या वर्षी या महाविद्यालयातील एकूण २६७ विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रवेश घेतला, त्यापैकी ३५ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले, ५९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर १०४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेतील निकालात प्रथम क्रमांक गौरव गिरीश लड्डा (९३.६७ टक्के), द्वितीय क्रमांक साक्षी गुणवंत फावडे (९३.३३ टक्के) व स्मृती शंभूपाद कुलकर्णी (९३.३३ टक्के), तर तृतीय क्रमांक माज इरफान शेख (९३ टक्के) यांनी मिळवला. याशिवाय रुद्राक्ष भातगावे (९१.५० टक्के), श्रीकृष्णा चोथवे (९१.१७ टक्के), करण जाधव (८९.८३ टक्के) आणि साईनाथ चामले (८९.३३ टक्के) यांनीही घवघवीत यश संपादन केले तसेच वाणिज्य शाखेतील ११ विद्यार्थ्यांनी पाली विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले, ज्यामुळे महाविद्यालयाचा गौरव अधिक वाढला.

विज्ञान शाखेत वेद देशमुख (८६.६७ टक्के) प्रथम, अनन्या सोरेकर (८४.८३ टक्के) द्वितीय आणि अष्टेकर सोहम (८३.६७टक्के) तृतीय क्रमांकावर राहिले. तसेच अग्रवाल तन्मय (८१. ८३ टक्के), नरवडे नंदिनी (८१. ५० टक्के), पाटील धरती (७९. ८३ टक्के), पाटील स्वप्निल (८९. ३३ टक्के) यांनी उत्तम गुण घेऊन यश संपादन केले. कला शाखेतून ३ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे एच.एस.सी.बोर्ड मध्ये घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ मे :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील १२वी कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्यवसाय अभ्यासक्रम शाखेच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळा मार्फत फेब्रु/मार्च-२०२६ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही गुणवत्तेची परंपरा कायम राखून घवघवीत यश मिळविले आहे.

विज्ञान शाखेचे ३४२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यामध्ये ०४ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. तसेच ६९ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण व १९० विद्यार्थी द्वितीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले. विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९३.८५% लागला असून यामध्ये गरड दीपक गणेश ८२.५०% गुण मिळवून महाविद्यालयात विज्ञान शाखेतून प्रथम आला आहे. तसेच कु. बेल्लाळे सृष्टी विकास ८०.३३ % गुण मिळवून द्वितीय व दीक्षित वरद वसंत ७८.८३ % गुण मिळवून तृतीय आलेला आहे.

वाणिज्य शाखेचे २०२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यामध्ये ०८ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. तसेच २६ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण व ५९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीतून उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेचा एकूण निकाल ६७.८२% लागला असून यामध्ये कु. लोया निलाक्षी मधुसूदन ही ९०.००% गुण मिळवून महाविद्यालयात वाणिज्य शाखेतून प्रथम आली आहे. तसेच कु. क्षीरसागर पायल महादेव ८५.३३% गुण मिळवून द्वितीय व कु. जाजू रेणुका गोकुल ८२.३३ % गुण मिळवून तृतीय आलेली आहे.

कला शाखेचे १४० विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यामध्ये ०१ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाला. तसेच १४ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण व ६४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले. कला शाखेचा एकूण निकाल ७०.००% लागला असून यामध्ये माने पृथ्वीराज राजाभाऊ हा ८२.५० % गुण मिळवून महाविद्यालयात कला शाखेतून प्रथम आला आहे. तसेच कु. हरणे सोनाक्षी नितीन ७२.६७ % गुण मिळवून द्वितीय व कु. गाडे सुहानी प्रताप ७१.०० % गुण मिळवून तृतीय आलेली आहे.व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचे ५५ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यामध्ये ०३ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. तसेच ०७ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण व ३० विद्यार्थी द्वितीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले. व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचा एकूण निकाल ८१.८१% लागला असून यामध्ये अमान फरीद शफिक शेख या विद्यार्थ्याने ७५.३३ % गुण मिळवून महाविद्यालयात व्यवसाय अभ्यासक्रम शाखेतून प्रथम आला आहे. तसेच मराठी विषयांमध्ये ९५ गुण घेऊन तो एच एस सी बोर्डात सर्वप्रथम आलेला आहे. तसेच भोसले नैतिक गुणवंत या विद्यार्थ्याने ७३.१७% गुण मिळवून द्वितीय व पवार साईनाथ महादेव हा ७१.५० % गुण मिळवून तृतीय आलेला आहे.

तसेच दिव्यांग प्रवर्गातून सार्थक संजय गवई याने कला शाखेतून उज्ज्वल यश संपादन केले असून तो महाविद्यालयातून प्रथम आलेला आहे.

## ट्रॅक्टर चालकास जिवे मारण्याची धमकी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ मे : चिंचोली ब. (ता. लातूर) येथील शिवारात शेतात नांगरणी करण्यासाठी गेलेल्या ट्रॅक्टर चालकाला फोनवरून शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. याप्रकरणी गातेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.**

**सुनील अंबादास गाडेकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांनी शेतात नांगरणीसाठी ट्रॅक्टर पाठवला असता, आरोपी अर्जुन आबाजी कणसे व इतर दोघांनी चालकाला अडवून तू जर शेतात आलास तर तुला जिवे मारीन, अशी धमकी दिली. पोलिसांनी या तक्रारीची दखल घेत तिघांविरुद्ध गुन्हा नोंदविला.**

## लातूर क्रेडाईच्या वतीने १ मे सामाजीक उपक्रमांनी साजरा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ मे :** लातूर क्रेडाईच्या वतीने आयोजीत १ मे २०२६ ध्वजारोहन व कामगारांच्या सत्कार व बांधकाम मजुरांप्रती कृतज्ञता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम दिशा फाऊंडेशन व क्रेडाई लातूर यांच्या वतीने आयोजीत करण्यात आला होता. दिशा फाऊंडेशनचे तज्ञ प्रवीण पाटील व डॉ. प्रदीप नागुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

लातूर क्रेडाईचे अध्यक्ष उदय पाटील, सचिव विष्णू मदने, राष्ट्रीय क्रेडाईचे सदस्य डॉ. धर्मवीर भारती, चेअरमन जगदीश कुलकर्णी, माजी अध्यक्ष सुबोध बेळंबे, क्रेडाईचे भावी अध्यक्ष संतोष हत्ते, डी. बी. रिॲलिटीचे संचालक बंकट भांगडीया, दुर्गेश ब्रिजवासी, कार्यक्रमाचे प्रोजेक्ट चेअरमन नागनाथ गिते, आकाश कोटलवार, प्रशांत रेड्डी व लातूर क्रेडाईचे सर्व ओबी टीम उपस्थित होती.

महाराष्ट्र दिन हा कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. त्या दृष्टीने लातूर क्रेडाईने सामाजीक उपक्रम म्हणून बांधकाम मजुरांप्रती कृतज्ञता सप्ताह व मोफत आरोग्य तपासणी शिबीराचेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी लातूर जिल्ह्यातील बांधकाम मजुरांना स्कील डेव्हलपमेंटचे ट्रेनिंग देण्यात आले. लातूर क्रेडाईच्या वतीने महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून केलेल्या उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या उपक्रमासाठी लातूर क्रेडाईचे संपूर्ण पदाधिकारी व ओबी मेंबर उपस्थित होते.

## श्री त्रिपुरा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयचा बारावी बोर्ड परीक्षेत घवघवीत निकाल



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ मे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळा तर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता बारावी (क्हडउ) विज्ञान शाखेच्या मार्च २०२६ परीक्षेचा निकाल नुकताच घोषित झाला असून, लातूर येथील श्री संगमेश्र्वर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्री त्रिपुरा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय व रिलायन्स लातूर पॅटर्नने पुन्हा एकदा आपल्या देदीप्यमान यशाची परंपरा कायम ठेवली आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९८.५% लागला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

गुणवंतांची यशोगाथा: संस्थेतून सुचिता कांबळे या विद्यार्थिनीने ९०.६६% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच स्नेहा डोंकारी (९०.१६%) याने द्वितीय आणि सागर रमेश कारीगार (९०.००%) याने तृतीय क्रमांक मिळवला आहे.

संस्थेतील एकूण विद्यार्थ्यांमध्ये १६ विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा अधिक गुण मिळवून संपादन केले.

भौतिकशास्त्र (PHYSICS) १०० पैकी ९० पेक्षा अधिक गुण मिळवणारे ०९ विद्यार्थी रसायनशास्त्र (CHEMISTRY): १०० पैकी ९० पेक्षा अधिक गुण मिळवणारे १३ विद्यार्थी गणित (MATHEMATICS): १०० पैकी ९० पेक्षा अधिक गुण मिळवणारे १६ विद्यार्थी. जीवशास्त्र (BIOLOGY) १०० पैकी ९० पेक्षा अधिक गुण मिळवणारे ०९ विद्यार्थी अभिनंदन व कौतुक विद्यार्थ्यांच्या या उतुंग यशाबद्दल श्री संगमेश्र्वर चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थाध्यक्ष प्रा. उमाकांत होनराव, संस्थेच्या सचिव तथा प्राचार्या सौ. सुलक्षणा केवळराम, कार्यकारी संचालक ओंकार होनराव, कोषाध्यक्षा प्रेरणा होनराव यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे अकॅडेमिक प्रमुख, रिलायन्स लातूर पॅटर्नची संपूर्ण तज्ज्ञ प्राध्यापक टीम, मेहनत घेणारे कर्मचारी वृंद आणि विद्यार्थ्यांची जिद्द व सातत्यपूर्ण अभ्यास असल्याचे मत संस्थाध्यक्षांनी व्यक्त केले. या यशाबद्दल लातूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून महाविद्यालयाचे कौतुक होत आहे.

## राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचा ९५ टक्के निकाल



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ मे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२वी परीक्षेचा निकाल शनिवारी जाहीर झाला आहे. यात राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली असून महाविद्यालयाचा निकाल ९५ टक्के लागला आहे.

विज्ञान शाखेत सोनाली शरद पंचगल्ले ही ८४.०० टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम, कृष्णा रंगनाथ निरगुडे ७९.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय तर सृष्टी अनिल बाहेती ७८.०० टक्के गुण घेत तृतीय आली आहे. तर कला शाखेत वैष्णवी रोहिदास गायकवाड ६५.०० टक्के गुण घेऊन प्रथम, आबेद अफजल शेख ५८.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर स्नेहा रमेश राठोड ५८.०० टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. वाणिज्य शाखेत नाहेदाबानो खुनमीर मुंगले ८३.०० टक्के गुण मिळवून प्रथम, असिफ मोहमंद हनिफ शेख ६६.०० टक्के गुण द्वितीय, तर जयश्री दिगांबर गवळी ५२.०० टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे.

या यशाबद्दल सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, शिक्षक आमदार विक्रम काळे, माजी मंत्री आमदार अमित देशमुख, शिक्षण उपसंचालक दीपक चवणे, शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, विद्यापीठाचे डीन डॉ. बाविस्कर, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, प्रा. बी. बी. खटके, प्रा. आर. ए. बदने, प्रा. आर. एन. पटने, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर आदींनी कौतुक केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
https://epaper.dainiktarunbharat.com/

मंगळवार, दि. ५ मे २०२६



# हर घर नल योजना कागदावरच

तभा वृत्तसेवा बालाजी गायकवाड

किनगाव **दि. ४ मे :** किनगावची लोकसंख्या लक्षात घेऊन अनेक वर्षांपूर्वी गावाला पाणी मिळावे यासाठी पाणीपुरवठा योजना किनगाव पासुन साधारणता ११ कि. मीटर अंतरावर असलेल्या व्हटी मध्यम प्रकल्पातून राबविण्यात आली होती.ती योजना आता कालबाह्य झाली आहे.गावाचा विस्तार लक्षात घेऊन नवीन पाईपलाईन मंजूर करण्यात आली, त्याचे काम अर्धवट झाले असून काम अद्यापही पूर्ण झाले नाही. तत्काळ काम पूर्ण करून गावाला पाणी मिळावे यासाठी सबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून कंत्राटदारास आदेश देण्यात यावेत अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.



अहमदपुर तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठेचे गाव म्हणून किनगावची तालुक्यातच नव्हे तर जिल्हयात ओळख आहे.गावाची गरज लक्षात घेऊन पूर्वीच्या अहमदपूर व आताच्या रेणापूर तालुक्यातील व्हटी मध्यम प्रकल्पातून किनगाव येथील नागरिकांसाठी स्टँड पोस्ट योजना अमलात आली होती.या स्टँड पोस्ट योजनेचे पुढे रूपांतर नळ योजनेत झाले.गावाचा विस्तार वाढत गेला सध्या गावाची लोकसंख्या तीस ते पस्तीस हजारच्या जवळपास झाली आहे. १९९२ च्या दरम्यान करण्यात आलेली ही जुनी पाईपलाईन योजना कुचकामी ठरत आहे. जागोजागी पाईपलाईन फुटून पाणी गळती होत आहे.त्यामुळे किनगावकरांचे पाण्यासाठी हाल - बेहाल होत आहेत. जलजीवन मिशन योजने अंतर्गत किनगांव व २ गावांच्या पाणीपुरवठा योजनेस मंजुरी मिळाली व सन २०२१/२०२२ मध्ये निविदा निघाली. त्यानंतर दोन वर्षाच्या जवळपास संबंधित गुत्तेदार यांनी काम पूर्ण करणे गरजेचे होते.मात्र प्रत्येक वेळी वेग वेगळे कारणे देऊन संबंधित विभागाचे अधिकारी व संबंधित गुत्तेदार हे कामात वेळ काढू पणा करीत असल्याचे सांगीतले जाते. गेल्या चार वर्षापासून कासव गती पेक्षाही कमी गतीने गुत्तेदार काम करीत असल्याचे दिसत आहे.संबंधित गुत्तेदार यांना कामाला गती देण्याचे आदेश देणे गरजेचे आहे. मे महिना सुरू झाल्याने उन्हाचे चटके बसण्यास सुरुवात झाली आहे . त्यातच पाण्याची कमतरता पहायला मिळत आहे .जुनी पाईपलाईन कुचकामी झाली असल्याने पाणीपुरवठा व्यवस्थित होत नसल्याने गावाला पाणी मिळणे अवघड झाले आहे.नवीन पाईपलाईनचे काम पूर्ण करून तत्काळ किनगावला पाणी पुरवठा सुरू करण्याकरिता संबंधित विभागाचे अधिकारी व गुत्तेदार यांनी प्रयत्न करावेत अन्यथा गावच्या पाण्याचा प्रश्र्न गंभीर होऊन गावकऱ्यांच्या रोषाला सामोरे जाण्याची वेळ प्रशासनावर येईल. अनेक भागात पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी बोर व विहिरीचा आणि टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. पाणी पुरवठा योजनेचे काम कासव गतीने होत असल्याने नागरिकात संताप पाहायला मिळत आहे.

## संक्षिप्त...

### बळीरामजी सोनटक्के यांचे निधन



तभा वृत्तसेवा

**चाकूर दि. ४ मे :** लातूर जिल्ह्यातील चाकूर येथील मराठवाडा मुक्ती संग्रामातील धाडसी व सशस्त्र लढ्याचे अग्रणी ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक बळीरामजी बापूराव सोनटक्के (वय १०१) यांचे रविवारी (दि.३) दुपारी १ वाजता चाकूर येथील त्यांच्या स्वगृही वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी (दि. ४) सकाळी १० वाजता शासकीय विश्राम गृह शेजारी, चाकूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध पेटून उठलेल्या चाकूर परिसरातील तरुणांमध्ये सोनटक्के हे अग्रस्थानी होते. अवघ्या २२ व्या वर्षी त्यांनी स्वातंत्र्यासाठी शस्त्र हाती घेत सशस्त्र लढ्यात सक्रिय सहभाग नोंदविला. सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी पोलिस ठाण्यातील शस्त्रसाठा हस्तगत करून स्वातंत्र्यलढ्याला बळ दिले. रजाकारांच्या अत्याचारांना त्यांनी कडवे प्रत्युत्तर देत जनतेच्या संरक्षणासाठी अनेक लढे उभे केले. कारावास, साखळदंड व छळ सहन करूनही त्यांच्या देशभक्तीची जाज्वल्य ज्योत कधीच विझली नाही. अहमदपूर व बिदर येथील तुरुंगवासादरम्यानही त्यांनी स्वातंत्र्याची प्रेरणा जिवंत ठेवली. त्यांच्या विरोधात साक्ष देण्यास कोणी पुढे न येणे हे त्यांच्या लोकमान्यतेचे द्योतक होते. मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षात त्यांनी आपल्या लढ्याच्या आठवणी सांगत नव्या पिढीसमोर इतिहास जिवंत केला होता. त्यांच्या निधनाने चाकूर तालुक्यासह संपूर्ण मराठवाड्यात शोककळा पसरली असून, त्यांच्या जाण्याने इतिहासाचा एक जिवंत साक्षीदार हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

### शिरूर अनंतपाळ तालुक्याचा निकाल ८६.७४ टक्के

तभा वृत्तसेवा

**शिरूर अनंतपाळ दि. ४ मे :** लातूर १२ वी बोर्डाचा निकाल दि २ मे राजी दुपारी लागला असून गत वर्षी च्या तुलनेत कला शाखेचा निकालाचा टक्का घसरला असून विज्ञान शाखेचे निकाल शंभर टक्के लागले आहेत . बारावीच्या झालेल्या परिक्षांमुळे यंदाच्या निकालाची विद्यार्थी व पालक उत्सुकतेने वाट पाहत होते. अखेर शनिवारी दुपारी एक वाजता बारावीचा निकाल ऑनलाईन जाहिर झाला आहे. यंदा कला शाखेच्या निकालाचा टक्का घसरला असून शिरूर अनंतपाळ तालुक्याचा एकूण निकाल ८६ .७४ टक्के लागला आहे.

तालुक्यातील दहा उच्च माध्यमिक विद्यालयातून कला वाणिज्य व विज्ञान शाखेतून घेण्यात आलेल्या बारावी बोर्डाच्या परीक्षेत तालुक्यातुन ७१० विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी ६०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यात अनेक शाळांचा निकाल शंभर टक्के लागला असून यशाची परंपरा कायम ठेवली आहे.उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा पालक व मित्रपरिवारातून कौतुक केले जात आहे.

यात साने गुरूजी उच्य माध्यामिक विद्यालय कांबळगा व लोकजागृती उच्च माध्यामिक विद्यालय रापका , अनंतपाळ नूतन उच्च माध्यमीक विद्यालय , प्रिय दर्शन उच्च माध्यमीक विद्यालय व शासकीय आयटी आय विज्ञान शाखेचा विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून या शाळेतील विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम ठेवली आहे. शहरातील श्री अनंतपाळ नूतन विद्यालय विज्ञान १०० टक्के तर कला ७२. ९७ ,मन्मथ स्वामी विद्यालय ७५ टक्के, रापका येथील लोक जागृती उच्च माध्यमीक विद्यालय विज्ञान १०० टक्के , कला शाखा ८० . ४० टक्के , वाणिज्य ९३ . ५४ टक्के , लिंबाजी विद्यालय उजेड ६८ . ५७ टक्के,,जिजामाता विद्यालय येरोळ ८६ . ८४ टक्के,नृसिंह विद्यालय राणी अंकुलगा ५७ . १४ टक्के, प्रियदर्शनी विद्यालय साकोळ विज्ञान - १०० ,कला शाखा ५७ . ५७ टक्के,श्री रघुवीर विद्यालय चांबरगा ८० . ६४ टक्के निकाल लागला आहे.

या निकालातून अनेक विद्यार्थ्यांनी बाजी मारत आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवत शाळेसह आई वडिलांचा नावलौकिक केला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा शिक्षणमहर्षी प्रभाकरराव कुलकर्णी,जे. जी.सगरे,,काशीनाथराव देवंगरे,पी.एन.पोसाने, ,महावरकर सर, प्रकाश जाधव,बी.जी. शेलार, शिवाजीराव मादलापुरे,तानाजी मुडे,प्रदिप जाधव, यांसह शिक्षण प्रेमींनी अभिनंदन केले आहे.

### वाहतुकीस अडथळा चालकावर गुन्हा

तभा वृत्तसेवा

**शिरूर अनंतपाळ दि. ४ मे :** रेणापूर येथील गांधी चौक परिसरात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी एका वाहन चालकावर कारवाई करण्यात आली आहे. २ मे रोजी पिंपळफाटा ते खरोळा रोडवर आरोपीने आपले वाहन (क्र. चक २४ उऊ ३३८७) भररस्त्यात उभे केले होते. यामुळे स्वतःच्या व इतरांच्या जीवितास धोका निर्माण होऊन रहदारीला मोठा अडथळा निर्माण झाला. पोलिस उपनिरीक्षक प्रवीण गायकवाड यांच्या फिर्यादीवरून रेणापूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलिस हवालदार मामडगे पुढील तपास करत आहेत.

# चोरी करणाऱ्या सराईत आंतरजिल्हा आरोपींना अटक




तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ४ मे : लातूर जिल्ह्यातील मालमत्ता विषयक गुन्ह्यांवर प्रभावी आळा घालण्याच्या दृष्टीने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या अचूक नियोजन व धाडसी कारवाईत दोन सराईत आरोपींना अटक करून विविध पोलीस ठाण्यांतील चोरीच्या गुन्ह्यांचा उलगडा करण्यात यश मिळवले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मालमत्ता विषयक गुन्ह्यातील रेकॉर्डवरील आरोपी त्यांनी चोरी केलेले दागिने विक्री करण्याचा प्रयत्न करीत असताना कळंब रोड रेल्वे गेटजवळ हरंगुळ-वरवंटी शिवरस्त्यावर सापळा लावून सुमीत दगडू गरगेवाड (वय २७ वर्षे, रा. मळवटी रोड, लातूर), आकाश ऊर्फ भावड्या बाबुराव कांबळे (वय २७ वर्षे, रा. सिद्धेश्र्वर नगर, लातूर) या दोन आरोपींना काळ्या रंगाच्या पल्सर मोटारसायकलसह ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता आरोपींकडून १५ ग्रॅम सोन्याचे दागिने, रोख रक्कम, लोखंडी टामी तसेच गुन्ह्यात वापरलेली काळ्या रंगाची पल्सर मोटारसायकल (क्र. चक-३७ -उ-४७१८) असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीदरम्यान आरोपींनी सदर मुद्देमाल चोरीचा असल्याची कबुली दिली असून, मोटारसायकल पुणे येथून चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. पुढील तपासात आरोपींनी लातूर जिल्ह्यातील एमआयडीसी अहमदपूर व शिवाजीनगर येथील प्रत्येकी एक गुन्हा असे एकूण तीन गुन्हे, तर बाहेर जिल्ह्यातील चाकण (पुणे), राहुरी (अहिल्यानगर) आंबेजोगाई शहर (बीड) येथील तीन गुन्हे असे एकूण ६गुन्ह्यांची कबुली दिली आहे.

सदर कारवाईमुळे एमआयडीसी पोलीस ठाण्यातील अनेक गुन्ह्यांचा उलगडा झाला असून जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासह आरोपींना पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी पोलीस ठाणे एमआयडीसी यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे निर्देशन व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पो.उपनि. राजेश घाडगे,सपोउपनि. सर्जेराव जगताप पोलीस अंमलदार युवराज गिरी, राजेश कंचे,प्रदीप स्वामी,मोहन सुरवसे, सिद्धेश्र्वर मदने, जमीर शेख, प्रदीप चोपणे यांनी केली आहे.

## इस्कॉनतर्फे ५३० विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ४ मे :** इस्कॉन लातूरतर्फे आयोजित मूल्य शिक्षण संवर्धन परीक्षा स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. स्पर्धेत ५१ शाळांमधील सुमारे ५ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यातील ५३० विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधीक्षक अमोल तांबे, शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, चिराग सेनमा, मालिनी देवी दासी, श्रीनिवास प्रिय दास, घनश्यास शरण दास आदी उपस्थित होते. स्पर्धेत प्रथम क्रमांक (सायकल विजेते) ऋषिकेश गावकारे, सिद्धी कुलकर्णी, यशवंत देशमुख, साक्षी जाधव, श्रेयश कांबळे यांना मान्यवरांच्या हस्ते सायकल वितरीत करण्यात आली. पोलीस अधिक्षक अमोल तांबे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ पुस्तकातील शिक्षण पुरेसे नसून त्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांना भीतीमुक्त वातावरण देणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांवर केवळ गुणांचा ताण न देता योग, व्यायाम व खेळ यांना प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. याशिवाय शालेय परीक्षेपेक्षा संस्कार व मूल्य शिक्षण अधिक महत्त्वाचे असून त्यातूनच सुसंस्कारित व जबाबदार नागरिक घडतात, असे त्यांनी नमूद केले.

दर रविवारी इयत्ता १ ते १० वी विद्यार्थ्यांसाठी इस्कॉनद्वारे ऑफलाइन मूल्य शिक्षण वर्ग योग व ध्यान केंद्र, गरुड गार्डनच्या पाठीमागे, विशाल नगर येथे सायंकाळी ७वाजता आयोजित केले जात आहेत, सर्वांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन इस्कॉनच्यावतीने करण्यात आले आहे.

## मंगेशकर महाविद्यालयाचे बारावी बोर्ड परीक्षेत उज्ज्वल यश







तभा वृत्तसेवा

**निलंगा दि. ४ मे :** तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयाने फेब्रुवारी - मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी बोर्ड परीक्षेमध्ये यशाची उज्ज्वल परंपरा यंदाही कायम राखली आहे. महाविद्यालयातील वाणिज्य शाखेचा निकाल ८६.५१ टक्के व कला शाखेचा निकाल ७२.९७ टक्के लागला आहे. महाविद्यालयातून वाणिज्य शाखेतून ९१ व कला शाखेतून ४१ असे एकूण १३२ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. वाणिज्य शाखेतून २ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य व ६ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी संपादन केली आहे. कला शाखेतून १ विद्यार्थ्याने विशेष प्राविण्य व ४ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी संपादन केली आहे. वाणिज्य शाखेतून गुणानुक्रमे जान्हवी दत्ता बिरादार ८२.८३ टक्के - प्रथम क्रमांक, तुंगभद्रा बालाजी बिरादार ७५.६७ टक्के - द्वितीय क्रमांक व महेक गुलाब शेख ७२.५० टक्के - तृतीय क्रमांक संपादन केला आहे. कला शाखेतून गुणानुक्रमे प्रतीक राजेंद्र घंटे ७६.०० टक्के - प्रथम क्रमांक, अभिषेक राजेंद्र हुमनाबादे ७२.१७ टक्के - द्वितीय क्रमांक व संध्या रवींद्र सूर्यवंशी ६४.६७ टक्के - तृतीय क्रमांक संपादन केला आहे. शारदोपासक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बस्वराज वलांडे, उपाध्यक्ष राजेश वलांडे, सचिव रमेश बगदुरे, उपसचिव पंकज बियाणी, सर्व संचालक मंडळ व संस्था सदस्य, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा.प्रमोद मरगणे, प्रा.गंगाप्रसाद तोटावार, प्रा.सुनील सर्वज्ञ, प्रा.दुर्गादास सबनीस, प्रा.बलभीम सातपुते, प्रा.रवींद्र अंबुलगे, डॉ.विकास कुलकर्णी, प्रा.आशिष खडकेश्र्वर, प्रा.दगडू मुंडे, प्रा.श्रीकांत ढेबे, प्रा.अंजना मुळे, प्रा.अभिजित चवळे, प्रा.आदित्य गिरी, डॉ.सचिन हंचाटे, डॉ.प्रदीप पाटील, संजीवकुमार होसुरे, विलासराव बिरादार यांच्यासह प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी बारावी बोर्ड परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## व्हीएस पँथर्सतर्फे बुध्द जयंती साजरी

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ४ मे :** येथील व्हीएस पँथर्स युवा संघटनेच्या विद्यार्थी आघाडीच्या मराठवाडा विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बुद्ध जयंती निमित्त देखावा उभा करण्यात आला होता. या देखाव्याचे अनावरण संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन मस्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संघटनेचे मार्गदर्शक संतोष मांदळे, रवी कुरील, विद्यार्थी आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे, जिल्हा उपाध्यक्ष सुरज कांबळे, जिल्हा कार्याध्यक्ष नवनाथ शेंडगे, जयंती अध्यक्ष तेजस सरवदे, शहराध्यक्ष आविष्कार कांबळे, अक्षय कांबळे, शहर सचिव रोहित दंडे, रितेश जांभळे, सुदर्शन ओव्हळ, विशाल गायकवाड, विरनाथ गायकवाड, सुबोध महाळंगीकर, सुजित मस्के, उत्कर्ष सुर्यवंशी, ओम पाटील, अनिकेत पाटील आदी उपस्थित होते.

## तुळजाभवानी कनिष्ठ महाविद्यालयाचा १०० टक्के निकाल





तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ४ मे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२वी परीक्षेचा निकाल शनिवारी जाहीर झाला आहे. यात तुळजाभवानी कनिष्ठ महाविद्यालयाने घवघवीत यशाची परंपरा कायम राखली असून महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे.

विज्ञान शाखेत श्रेया गजानन क्षीरसागर ही विद्यार्थिनी ८२.१७ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम, कृष्णा विजयकुमार किसवे ७७.०० टक्के गुण घेऊन द्वितीय तर कुलदिप कैलासराव झोल हा ७६.०० टक्के गुण मिळवून तृतीय आला आहे.

या यशाबद्दल सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, शिक्षक आमदार विक्रम काळे, माजी मंत्री आमदार अमित देशमुख, शिक्षण उपसंचालक दीपक चवणे, शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, विद्यापीठाचे डीन डॉ. बाविस्कर, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, यांनी कौतुक केले आहे.

# वादग्रस्त व भ्रष्ट अभियंता ज्योती वलांडे यांचा पदभार काढला

## नगरसेवक सुधीर लखनगावे यांच्या उपोषणाला यश



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ४ मे : नगरपंचायत शिरुर अनंतपाळ वर गेल्या साडेचार वर्षांपासून भारतीय जनता पार्टी व मित्र पक्षाची सत्ता असून या कार्यकाळात विकास कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून या मध्ये नगर अभियंता यांना हाताशी धरून सत्ताधारी व कंत्राटदार यांनी संगनमताने शासकीय निधीचा गैरवापर केला आहे.

या बाबतीत दिनांक. २३ एप्रिल रोजी एप्रिल रोजी गेल्या अनेक वर्षांपासून अतीरिक्त पदभार असलेल्या अभियंता. ज्योती वलांडे यांच्या मनमानी कारभार,गुत्तेदार धार्जिणी वागणूक व अनियमितता अशा कामकाजाच्या विरोधात शिरूर अनंतपाळ नगरपंचायत मधील भारतीय जनता पार्टी चे नगरसेवक उमाकांत देवंगरे,सौ.सुषमा मठपती, काँग्रेस पक्षाचे नगरसेवक. सुधीर लखनगावे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,अजित पवार पक्षाचे माजी नियोजन सभापती संतोष शिवणे,सभापती सौ.श्रीदेवी संभाळे, श्रीमती. पार्वतीबाई देवंगरे व शिवसेना उध्दव ठाकरे पक्षाच्या नगरसेविका सौ. रागिणी शिवणे यांनी लातूर जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन अतिरिक्त अभियंता यांचा पदभार काढून घ्यावा अशी मागणी केली होती जर पदभार काढून घेतला गेला नाही तर ३० एप्रिल पासून नगरपंचायत कार्यालय समोर उपोषण करणार असा इशारा निवेदनाद्वारे दिला होता त्यानुसार नगरसेवक सुधीर लखनगावे यांनी आमरण उपोषणला सुरवात केली असता उपोषणाच्या ३ दिवशी मुख्याधिकारी यांनी अभियंता ज्योती वलांडे यांच्याकडील सर्व पदभार काढून घेण्यात आले असे लेखी दिले. उत्तर दिल्यानंतर नगरसेवक सुधीर लखनगावे यांनी उपोषण स्थगित केले या उपोषणा दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित दादा पवार,खासदार डॉ.शिवाजीराव काळगे, काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष. अशोकराव पाटील निलंगेकर यांनी जिल्हाधिकारी यांच्याशी फोनद्वारे संपर्क साधून उपोषणकर्ते यांची भावना कळवून प्रशासन व उपोषणकर्ते यांच्यामध्ये समन्वय घडवून आणला व उपोषण स्थगित करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका घेतली तसेच या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस. सुरज चव्हाण यांनी उपोषणस्थळी भेट देऊन पाठिंबा दिला तसेच लवकरच नगरविकास मंत्री यांची भेट घेऊन निवेदन देणार असल्याचे सांगितले या वेळी शिवसेना नेत्या डॉ.शोभाताई बेंजरगे यांच्या हस्ते नारळपाणी घेऊन उपोषण स्थगित केले या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे,काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अशोक कोरे,राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष व्यंकट हांद्राळे, शिवसेना ठाकरे पक्षाचे शहराध्यक्ष सतीश शिवणे,कार्याध्यक्ष संदीप धुमाळे,विरभद्र भातांब्रे गुरुजी, संग्राम हवा तसेच सर्व उपोषणकर्ते नगरसेवक उपस्थित होते

### दुचाकीवरून केली मारहाण



तभा वृत्तसेवा

**लातूर दि. ४ मे :** तालुक्यातील सेलू बु. येथे रस्त्यावर दुचाकी पार्क करण्याच्या कारणावरून झालेल्या वादात एकाला स्क्रू ड्रायव्हरने मारून जखमी केल्याची घटना घडली आहे. २ मे रोजी ही घटना घडली. भास्कर श्रीपती सांडूर यांनी सोन् दशरथ पवार याला रस्त्यात गाडी का लावली? अशी विचारणा केली असता, सोनूने तू मला विचारणारा कोण? असे म्हणत वाद घातला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि सोनूने भास्कर यांच्या डोक्यात स्क्रू ड्रायव्हरने मारून त्यांना जखमी केले. याप्रकरणी लातूर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहाय्यक फौजदार फुलारी या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. केवळ किरकोळ कारणावरून झालेला वाद मारहाणी पर्यंत गेला.

## तांबरवाडीत 'जलसमृद्ध औसा' अभियानाची सुरुवात



तभा वृत्तसेवा

**औसा दि. ४ मे :** गावाची दुष्काळग्रस्त म्हणुन असलेली ओळख पुसून टाकण्यासाठी जलसमृध्द औसा अभियान प्रभावी ठरणार असून आपल्या गावातील वाहून जाणारे पाणी गावातच जिरवण्याचा संकल्प साकारण्यासाठी सर्व गावकर्‍यांनी एकत्रित रैवून सहभागी व्हावे असे आवाहन आ. अभिमन्यू पवार यांनी केले आहे.

क्रिएटिव्ह फाऊंडेशन, टाटा मोटर्स फाऊंडेशन,नाम फाऊंडेशन आणि महाराष्ट्र शासध यांच्या संयुक्त विद्यमानेऔसा मतदारसंघातील तांबरवाडी येथे दि. १ मे रोजी 'जलसमृद्ध औसा' अभियानांतर्गत ग्रामसभा उत्साहात पार पडली.त्यावेळी आ. अभिमन्यू पवार बोलत होते. उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त माजी न्यायमुर्ती बी. आंबादास जोशी, जिल्हा सरचिटणीस सुभाष जाधव, जिल्हा प्रभारी सःतोष मुक्ता, सभापती चंद्रशेखर सोनवणे, उपसभापती अमोल पाटील, गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे, टाटा मोटर फाऊंडेशनचे प्रमोद घायाळ, , रिना कांबळे, सरपंच राधाकृष्ण जाधव, उपसरपंच राम बिराजदार, तंटामुक्ती अध्यक्ष सुग्रीव लोंढे, सचिन आनसरवाडे उपस्थित होते.

या अभियानांतर्गत तांबरवाडी परिसरातील नाल्यांचे सर्वंकष खोलीकरण व रुंदीकरण करण्यात येणार असून दर १०० मीटर अंतरावर रिचार्ज शाफ्ट उभारले जाणार आहेत. तसेच पाण्याचे संवर्धन करण्यासाठी कम्पार्टमेंट बंडिंगची कामेही हाती घेण्यात येणार आहेत. काही दिवसांपूर्वी फत्तेपूर येथे या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला असून, त्या कामाला गती मिळाल्यानंतर आता तांबरवाडीतील कामांची सुरुवात करण्यात आली आहे.या उपाययोजनांमुळे पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ होऊन तांबरवाडी व परिसरातील गावे जलसमृद्ध होण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले जात असल्याचे सांगण्यात आले आहे.

जलसमृध्द अभियान अंतर्गत राबविण्यात येणार प्रकल्प राज्यासाठी दिशादर्शक ठरणार आहे.याशिवाय या सात गावांमध्ये 'सिल्क-मिल्क' संकल्पनेच्या धर्तीवर शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी ठिबक सिंचनाचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले. अपेक्षित कमी पावसाच्या पार्श्र्वभूमीवर पाणी बचतीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.यावेळी विविध मान्यवर, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अग्रलेख...

# काय चूक होती त्या लेकराची?

साडेतीन वर्षांची चिमुकली, अजून नीट जगही पाहिलं नव्हतं तिनं. आईच्या कुशीतून, खेळातून, निरागस हसण्यातून तिचं छोटंसं जग फुलत होतं. पण एका ६५ वर्षांच्या विकृत नराधमानं त्या कोवळ्या जीवावर अत्याचार केला आणि दगडानं ठेचून तिचं अवघं ४२ महिन्यांचं आयुष्य संपवलं. काय चूक होती त्या लेकराची? ती मुलगी होती, हीच का तिची चूक? माणूस म्हणून आपल्याला स्वतःचीच लाज वाटावी, अशी ही घटना पुणे जिल्ह्यातील नसरापुरात घडली. हजार टाचण्या काळजाला टोचल्यानंतर जशा असह्य वेदना होतात, तशाच वेदना कुठल्याही संवेदनशील माणसाला या घटनेनंतर जाणवायला हव्यात. दगडानं चिमुकलीला ठेचून तो नराधम जरी तुरुंगात गेला असला, तरी तिच्या रक्ताचे थेंब समाज म्हणून आपल्या प्रत्येकाच्या अंगावर उडालेले आहेतच. समाजातील कोणत्याही जाती, धर्माच्या माय-बापाला कायमची भयभीत, अस्वस्थ करणारी ही घटना आहे. यापुढे ही घटना इतिहासाच्या कुठल्यातरी पानावर असेल आणि अशा घटनांची गर्दी त्या पुस्तकात झालेली असेल. समाज आणि माणूस म्हणून आपल्या नैतिक पराभवाची ती जाहीर कबुली असेल. असे कलंक पुसण्यासाठी केवळ निषेध पुरेसा नसतो; न्याय, कठोरात कठोर शिक्षा आणि सामाजिक बदलांची मानसिकता आवश्यक असते. यंत्रणेने अशा नराधमाला लवकरात लवकर मृत्युदंडाची शिक्षा होईल, यासाठी मनापासून प्रयत्न करायला हवेत..

जुलै २०१६ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील कोपर्डी येथे अल्पवयीन शाळकरी मुलीवर अत्यंत क्रूरपणे बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्र संतापला, लाखोंचे मोर्चे निघाले आणि जलदगती न्यायालयात खटला चालवण्याची घोषणा झाली. घटनेनंतर सुमारे १७ महिन्यांनी, नोव्हेंबर २०१७ मध्ये जिल्हा व सत्र न्यायालयाने तिन्ही आरोपींना दोषी ठरवत फाशीची शिक्षा सुनावली. मात्र, खरा प्रश्न इथेच सुरू होतो, फाशीची शिक्षा सुनावली म्हणजे न्याय पूर्ण झाला का? अजिबात नाही. त्यानंतर उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय, दयेचा अर्ज आणि अनेक कायदेशीर प्रक्रिया यामध्ये वर्षानुवर्षे निघून जातात. न्यायालयाचा निकाल आला, पण शिक्षेची अंतिम अंमलबजावणी वर्षानुवर्षे लांबली, तर कायद्याचा धाक समाजात कसा निर्माण होणार? दहा वर्षांचा काळ जाऊनही आरोपी कारागृहात जिवंत आहेत. फास्ट ट्रॅक न्यायालये केवळ राजकीय घोषणांसाठी असतात. मुळात न्याय आणि जलद ही आपल्या व्यवस्थेत विसंगती मानली जाते. आपल्या देशात 'जलद न्याय' ही फक्त घोषणा असते; प्रत्यक्षात मात्र न्यायाची पायरी चढता चढता पीडितांचे आयुष्यच संपते. न्यायप्रक्रियेतला विलंब म्हणजे पीडितेवर दुसऱ्यांदा अन्याय. एका अभागी मुलीवर झालेल्या अत्याचारानंतर तिचं कुटुंब धैर्याने न्यायालयात जातं, पण तिथे त्यांना मिळतो अपमान, थकवा आणि एक अंतहीन प्रतीक्षा.

न्याय मिळायला अशी वर्षानुवर्षे लागत असतील, तर 'जनतेच्या न्यायालयात द्या' अशी मागणी होणारच. नसरापुरातील घटनेनंतर नागरिकांच्या संतप्त प्रतिक्रिया स्वाभाविकच होत्या. आपल्या देशात न्याय ही गोष्ट कधीतरी मिळणारी आणि प्रचंड प्रतीक्षेत अडकलेली प्रक्रिया बनली आहे. पीडित कुटुंब न्यायासाठी झिजत राहते, तर आरोपी कायद्याच्या पळवाटा शोधत राहतात. अशा वेळी लोकांच्या मनात व्यवस्थेविषयी अविश्वास निर्माण होणारच. त्यामुळेच कायद्याचा धाक उरत नाही आणि संतापाचा उद्रेक रस्त्यावर दिसू लागतो. शासन आणि प्रशासन यांनी किमान अशा प्रकरणांमध्ये तरी संवेदनाशून्य न वागता तातडीने काम करण्याची आवश्यकता आहे. न्यायावरचा, यंत्रणेवरचा विश्वास उडाला की लोक अस्वस्थ होतात. प्रश्न केवळ न्यायव्यवस्थेचा नाही; प्रश्न समाजाच्या मानसिकतेचाही आहे. एखादी घटना घडली की आपण आरोपीला शिव्या देतो, संताप व्यक्त करतो; पण आपल्या घरात, आपल्या संस्कारांत, आपल्या बोलण्यात स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन किती शुद्ध आहे, याचा विचार करतो का? मुलीला 'सावध राहा' सांगणारा समाज मुलाला 'संयम शिक' हे किती वेळा सांगतो? महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न फक्त पोलिस, न्यायालये किंवा शासनावर टाकून आपण मोकळे होऊ शकत नाही. विकृतीचा जन्म संस्कार, विचारांतून होतो. समाजाच्या गप्प राहण्यातूनही विकृती फोफावत असते. साडेतीन वर्षांच्या मुलीकडेही वासनेच्या नजरेने पाहणारा माणूस अचानक तयार होत नाही; तो विकृत संस्कारांतून तयार होतो. छोटे अपराध खपून जातात तेव्हा असे नराधम आकाराला येतात. घरात स्त्रीचा अपमान करणारे शब्द, मुलींवर बंधने आणि मुलांना मोकळीक, स्त्रीच्या स्वातंत्र्याकडे संशयाने पाहणारी दृष्टी, हे सगळे त्या विकृतीला खतपाणी घालतात. महिला सुरक्षा ही कायद्याची जबाबदारी नंतर आहे; सामाजिक संस्कारांची लढाई त्या आधी येते. महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचारांची संख्या सातत्याने वाढत असून २०२२ मध्ये राज्यात महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांची तब्बल ४९,३३१ प्रकरणे नोंदवली गेली. २०२१ मध्ये ही संख्या ३९,५२६ होती. म्हणजेच अवघ्या एका वर्षात सुमारे १५ टक्क्यांनी वाढ झाली होती. याचा अर्थ, सरासरी दर तासाला सुमारे ५ गुन्हे महिलांविरुद्ध घडत होते. या वर्षात बलात्काराच्या २,९०४ प्रकरणांची नोंद झाली आणि यात महाराष्ट्र देशात चौथ्या क्रमांकावर होता. महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये सर्वाधिक प्रमाण हे पती किंवा नातेवाईकांकडून होणाऱ्या क्रूरतेचे आहे. त्यानंतर अपहरण, विनयभंग आणि बलात्कार अशा घटना मोठ्या प्रमाणात आहेत. हे चित्र अधिक भयावह आहे, कारण अनेक प्रकरणे अजूनही पोलिसांपर्यंत पोहोचतच नाहीत. बलात्कार, छेडखानी, घरगुती हिंसा, बाल लैंगिक अत्याचार अशा घटनांची आकडेवारी म्हणजे आपल्या सामाजिक अपयशाच्या नोंदी आहेत. प्रत्येक घटनेनंतर मेणबत्त्या पेटतात, निषेधाचे मोर्चे निघतात, सोशल मीडियावर संताप व्यक्त होतो; पण काही दिवसांनी सर्व काही शांत होते. पीडितेच्या घरात दुःख कायम वास्तव्य करीत असते. बाकी लोक नव्या घटनेसाठी मेणबत्त्या पेटवण्याची वाट पाहत असतात आणि कायदा पुन्हा कागदपत्रांत आणि तारखांत हरवतो. समाज म्हणून आपण एवढे संवेदनाहीन झालो आहोत का? या प्रश्नाचा कधी तरी गांभीर्याने विचार व्हायला हवा. आपण स्वतःलाच विचारले पाहिजे की, आणखी किती चिमुकल्या मुलींवर अत्याचार झाले म्हणजे आपण समाज म्हणून कामाला लागू? घटना घडली की नेत्यांच्या भेटीगाठी, आश्वासने, कठोर कारवाईची भाषा आणि विरोधक-सत्ताधाऱ्यांमधील आरोप-प्रत्यारोप सुरू होतात. पीडित कुटुंबाला प्रत्यक्ष मदत, न्यायासाठी आवश्यक पाठबळ कोणाकडूनही मिळत नाही, हे वास्तव आहे. काळीज पिळवटून टाकणाऱ्या घटनाही राजकीय फायद्याच्या मोजपट्टीवर मोजल्या जातात. अत्याचारित मुलीच्या मृत्यूवरही राजकारण करणाऱ्या व्यवस्थेपेक्षा निर्लज्ज दुसरे काही असू शकत नाही. महिला सुरक्षेचा प्रश्न समाजाच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. आपली आई सुरक्षित नसेल, मुलगी सुरक्षित नसेल, तर कोणत्याही प्रगतीचा अभिमान निरर्थक आहे. विकासाच्या मोठ्या घोषणा, स्मार्ट सिटीची स्वप्ने आणि आधुनिकतेचे दावे तेव्हाच अर्थपूर्ण ठरतात, जेव्हा एका चिमुकलीला सुरक्षित जगण्याचा अधिकार मिळतो. नसरापुरातील त्या साडेतीन वर्षांच्या चिमुकलीसाठी आता आपण काहीच करू शकत नाही. तिचं बालपण, तिचं हसू, तिचं भविष्य, सगळं त्या दगडाखाली चिरडलं गेलं आहे. पण तिचा मृत्यू व्यर्थ जाऊ देऊ नये, ही जबाबदारी आपली सर्वांची आहे. तिच्या रक्ताचे डाग केवळ आरोपीच्या हातावर आहेतच; ते आपल्या आजपर्यंतच्या सामूहिक मौनावरही लागलेले आहेत. समाज म्हणून आता निर्णय घ्यावा लागेल, की आपण फक्त निषेध करणारे राहणार आहोत, की बदल घडवणारे नागरिक होणार आहोत? न्याय त्वरित, अतिशय कठोर आणि निर्विवाद झाला पाहिजे. विकृतीला सामाजिक बहिष्कारच मिळाला पाहिजे. मुलांना स्त्रीचा सन्मान शिकवणारे संस्कार इथल्या मातीत रुजायला हवेत. शासनाने 'फास्ट ट्रॅक'च्या घोषणांऐवजी प्रत्यक्ष न्यायाची हमी दिली पाहिजे. नाहीतर उद्या पुन्हा एखादी चिमुरडी मरेल, पुन्हा समाज संतापेल, पुन्हा राजकारण होईल आणि पुन्हा तोच प्रश्न उरेल, काय चूक होती त्या लेकराची?

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# दोन हत्तींच्या भांडणात...!

एक आफ्रिकन म्हण आहे, 'दोन हत्तींच्या भांडणात चिरडले जाते ते गवत.' वाळवंट आणि उंट असलेल्या आखाती देशांमध्ये हिरवेगार गवत नसले तरी कच्चे तेल व वायू याच्या भरवशावर या देशांमध्ये सुखसमृद्धीचा जो हिरवा मखमली गालिचा अंथरला गेला आहे, तो दोन हत्तींच्या म्हणजे अमेरिका व चीनच्या भांडणात उधडला जात आहे. एक योगायोग म्हणजे राष्ट्रपती ट्रम्प यांच्या पक्षाचे निवडणूक चिन्ह हत्ती आहे आणि चीनमध्ये निवडणुका वगैरे होत नसल्याने राष्ट्रपती जिन पिंग हेच त्या देशाचे 'चिन्ह' मानले जाते.

**३ ट्रिलियन!** : ३ ट्रिलियन डॉलर! ३ वर १२ शून्य म्हणजे ३,०००,०००,०००,००० डॉलर. दोन हत्तींच्या या भांडणात जगाचे आजवर एवढे नुकसान होऊन गेलेले आहे. आणि नुकसानीचा हा आकडा किती वाढेल हे सांगण्याच्या स्थितीत कुणीही नाही. जागतिक दर्जाच्या काही आर्थिक संस्थांनी हा निष्कर्ष काढला आहे.

**भारताचा क्रमांक घसरला** : अमेरिका-इराण युद्ध सुरू होण्यापूर्वी भारताची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकावर पोहोचत होती, ती आता सहाव्या क्रमांकावर घसरली आहे. ३१ ट्रिलियनच्या अर्थव्यवस्थेसह अमेरिका पहिल्या क्रमांकावर आहे तर १९ ट्रिलियन अर्थव्यवस्था असेलला चीन दुसऱ्या क्रमांकावर आहे. जर्मनी ४.७ ट्रिलियनसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. जपान चौथ्या, ब्रिटन पाचव्या क्रमांकावर आहे आणि भारत सहाव्या क्रमांकावर घसरला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे डॉलरच्या तुलनेत रुपयाची झालेली घसरण. युद्ध सुरू झाल्यापासून रुपयाची जी पडझड सुरू झाली त्याचा हा परिणाम मानला जातो. भारताला अधिक दराने कच्चे तेल व नैसर्गिक वायूची खरेदी करावी लागत आहे. याचा फटका सामान्य जनतेला बसत आहे. काही लहान उद्योग ठप्प झाले आहेत. मोठ्या उद्योगांनाही याची झळ बसेल अशी स्थिती तयार होत आहे.

**इराणचे नुकसान** : स्वाभविकच इराणचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. इराणमधून होणारी कच्च्या तेलाची निर्यात थांबली आहे. इराणच्या सर्वांत मोठ्या नैसर्गिक वायू उत्पादन प्रकल्पाला या युद्धाचा मोठा फटका बसला आहे. अमेरिका- इस्रायल यांच्या हल्ल्यात इराणमधील काही पायाभूत प्रकल्प उद्ध्वस्त झाले आहेत. त्यातील काहींची फेरउभारणी केल्याचा दावा इराणने केला आहे. मात्र इराणचे नुकसान हजारो कोटींच्या घरात आहे.

नव्या माहितीनुसार इराण कच्च्या तेलाचे उत्पादन तर करीत आहे, पण होर्मुझ बंद असल्याने त्याची तेल निर्यात थांबली आहे. दुसरीकडे तेल उत्पादन तर सुरू आहे. या तेलाची आणखी फक्त २२ दिवस साठवणूक करता येईल एवढीच इराणची क्षमता आहे. म्हणजे २२ दिवसांत होर्मुझ सुऐ न झाल्यास, इराणला आपले दैनंदिन तेल उत्पादन घटवावे लागेल. तेल उत्पादनात घट म्हणजे जागतिक तेल किमतीत वाढ.

**अमेरिकालाही नुकसान** : आखाती देशांमध्ये अमेरिकेचे जे लष्करी तळ होते, त्याला इराणने लक्ष्य केले होते. यात अमेरिकेचे मामुली नुकसान झाल्याचे प्रारंभी मानले जात होते. मात्र आता समोर आलेल्या नव्या माहितीनुसार या हल्ल्यांमुळे अमेरिकेचे हजारो कोटी डॉलर्सचे नुकसान झाले आहे. या तळांवर उभी असलेली अमेरिकेची अद्ययावत विमाने इराणच्या हल्ल्यात पार निकामी झाली असल्याचे आता मान्य केले जात आहे. याचाच परिणाम म्हणजे 'पेंटॉगॉन' या लष्करी मुख्यालयाने अमेरिकन काँग्रेसकडे काही लाख कोटींची मागणी केली आहे. यातील मोठी रक्कम आखाती देशातील नष्ट झालेले हवाई तळ दुरुस्त करण्यावर खर्च केली जाणार आहे.

**आखाती देशांचे नुकसान** : सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात, कतार, कुवैत व बहरीन या पाच देशांनाही या युद्धाचा मोठा फटका बसला आहे. कतारचे नैसर्गिक वायू उत्पादन केंद्राचे भरपूर नुकसान झाले असून ते पूर्ववत सुरू होण्यास किमान दोन वर्षे लागतील असा अंदाज वर्तविला जात आहे. याशिवाय संयुक्त अरब अमिरात म्हणजे दुबई व सौदी अरेबिया यांच्यातील पर्यटनाला या युद्धाचा मोठा फटका बसला आहे.

**दुहेरी नाकेबंदी** : अमेरिकेने होर्मुझची नाकेबंदी करून इराणची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे तर त्याला उत्तर म्हणून इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद करून साऱ्या जगाची आर्थिक नाकेबंदी केली आहे. या दोन नाकेबंदींच्या तडाख्यात जागतिक अर्थव्यवस्था सापडली आहे.

**व्यापक परिणाम** : होर्मुझची नाकेबंदी व आखाती देशांमधील लष्करी हालचालींमुळे जागतिक सागरी व्यापार वाहतुकीवर परिणाम झाला आहे. जहाज कंपन्यांचे व्यवहार एकतर ठप्प झाले आहेत वा कमी झाले आहेत. याचा परिणाम जहाज कंपन्यांच्या दरवाढीवर झाला आहे. स्वाभाविकच या जहाजांमधून पाठविल्या जाणाऱ्या वस्तूंच्या किमती वाढणार आहेत आणि त्याची झळ सरळसरळ सामान्य ग्राहकाला बसणार आहे.

**उद्योग प्रभावित** : नैसर्गिक वायूचा पुरवठा प्रभावित झाल्याने अनेक उद्योगांना त्याचा फटका बसणे सुरू झाले आहे. यात सेमीकंडक्टर, मायक्रोचिप क्षेत्राचा विशेष उल्लेख केला जातो. याने जागतिक पुरवठ्याची साखळी खंडित झाली आहे. ती पूर्ववत होण्यास बराच काळ लागण्याची भीती वर्तविली जात आहे. कृषी क्षेत्रही यामुळे प्रभावित होणार असून रासायनिक खतांचा पुरवठा खंडित वा विलंबित होणार आहे. भारतासह आशियातील देशांना याचा फटका बसण्याचा अंदाज वर्तविला जात आहे.

**एक अंदाज** : यूएनडीपी म्हणजे युनायटेड नेशन्स डेव्हलमपेंट प्रोग्रामने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, जगात काही लाख लोक द्रारिद्ररेषेच्या खाली जाणार आहेत. अविकसित देशांना याचा सर्वाधिक फटका बसणार असल्याचे या अहवालात सांगण्यात आले आहे.

**४० टक्के आखातातून** : परदेशात काम करणारे भारतीय भारतात जो पैसा पाठवितात त्यातील ४० टक्के रक्कम आखाती देशांमधून भारतात पाठविली जाते. आखाती देशांमध्ये जवळपास १ कोटी भारतीयांना रोजगार मिळाला आहे. या युद्धाचा या देशांच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होणे अपरिहार्य आहे. स्वाभाविकच तेथे कार्यरत भारतीयांच्या रोजगारांवर काही प्रमाणात गदा येईल असे मानले जाते. तसेच हे भारतीय आपल्या मायदेशी म्हणजे भारतात जो पैसा पाठवीत होते, त्यातही घट होईल असाही अंदाज वर्तविला जात आहे.

**२८ फेब्रुवारी...** : होर्मुझच्या सामुद्रधुनीतून २८ फेब्रवारीपूर्वी ज्या मुक्तपणे जहाजांची ये-जा सुरू होती, ती यापुढे होणार नाही असे इराणने वारंवार स्पष्ट केले आहे. २८ फेब्रवारीपूर्वी होर्मुझ सामुद्रधूनीतून ये-जा करणाऱ्या जहाजांवर इराण कोणतेही शुल्क लावीत नव्हता. मात्र आता त्याने असे शुल्क लावण्याचा निर्णय घेतला आहे. पनामा कालवा व सुएझ कालवा यातून जाणाऱ्या जहाजांकडून एक विशिष्ट शुल्क लावले जाते, तसेच ते होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांवर लावले जाईल असे इराणने म्हटले आहे. याला अमेरिकेने विरोध केला. पण, इराण आपल्या भूमिकेवर ठाम आहे. युद्धात इराणचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी आता आम्हाला असे शुल्क लावणे आवश्यक आहे असे इराणने म्हटले आहे. अमेरिका-इराण यांच्यातील हा गतिरोध लवकर न संपल्यास जागतिक अर्थव्यवस्था प्रभावित होणार असल्याचे निष्कर्ष वेगेवेगळ्या संस्थांनी काढले आहेत. मूडीज या पत मानांकन करणाऱ्या संस्थेने भारताचा जीडीपी ६.८ टक्क्यांवरून ६ टक्क्यांवर घटविला आहे. मात्र तरीही भारताची आर्थिक स्थिती स्थिर राहील असे सांगितले आहे.

साऱ्या जगाला अडचणीत आणणाऱ्या या संघर्षातील दुसरा हत्ती म्हणजे चीनचा ड्रॅगन. तो शांतपणे सारा खेळ घडवीत आहे.

## वेध

पुंडलिक आंबटकर

# उष्णतेची लाट तीव्र होणार

सध्या ढगाळ वातावरणामुळे पारा काही अंशी कमी झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे. परंतु, एका जागतिक हवामान विश्लेषणानुसार २०२६ हे सर्वाधिक उष्ण वर्ष ठरण्याची शक्यता आहे. एप्रिल महिन्यात संपूर्ण विदर्भ रखरखत्या उन्हाने होरपळून निघाला. सर्वाधिक झळ अकोला, अमरावती, वर्धा आणि नागपूर या चार जिल्ह्यांना बसली. ढगाळ वातावरण निवळताच विदर्भात पुन्हा उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून यंदा पावसाळा लवकर दाखल होण्याचे संकेत वेधशाळेने दिले आहेत. परंतु, पावसाळा लांबला तर मे आणि जून महिन्यातही विखारी उन्हाचा सामना विदर्भवासीयांना करावा लागणार आहे.

२०१३ हे वर्ष विदर्भासाठी सर्वाधिक उष्ण ठरले होते. २०१३ च्या मे महिन्यात पारा ४८ अंशांपर्यंत पोहोचल्याने सर्व विक्रम मोडीत निघाले होते. त्यानंतर आता २०२६ मध्ये पारा ४६.९ अंशांपर्यंत पोहोचला. उन्हाळ्याचा आणखी १ महिना शेष आहे. अशा परिस्थितीत पुन्हा उष्णतेची लाट आल्यास नव्या विक्रमाची नोंद होऊ शकते. जगातील १० सर्वाधिक उष्ण शहरांमध्ये विदर्भातील ४ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. दरवर्षी उन्हाळ्यात चंद्रपूर जिल्ह्याचे तापमान अधिक असते. यंदा मात्र अमरावती, अकोला आणि वर्धा जिल्ह्याने चंद्रपूरला मागे सोडले आहे. २९ एप्रिल २०१३ रोजी चंद्रपूर जिल्ह्यात ४७.६ अंश तापमान नोंदविण्यात आले होते. यंदा मात्र याच तारखेला चंद्रपूर जिल्ह्यात ४५ अंश तापमानाची नोंद झाली.

२३ मे २०१३ रोजी नागपूर जिल्ह्याचा पारा ४७.९ अंशांपर्यंत पोहोचला होता. हा एक प्रकारचा विक्रम ठरला होता. यंदा अद्याप हा विक्रम मोडीत निघालेला नाही. परंतु, मे महिन्यात उन्हाचा कडाका वाढल्यास नागपूरकरांना २०१३ चा अनुभव पुन्हा येऊ शकतो. २६ एप्रिल २०२६ रोजी अकोला जिल्ह्यात ४६.९ इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली. देशातील हे या दिवसाचे सर्वाधिक कमाल तापमान ठरले. यंदा मान्सून वेळेवर किंवा त्यापूर्वीच दाखल होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तविली आहे. केरळमध्ये मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पाऊस दाखल होऊ शकतो. महाराष्ट्रात साधारणतः मान्सूनचे आगमन १०-१२ जूनदरम्यान होते. यंदा हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, २ ते ३ जूनदरम्यान मान्सून महाराष्ट्रात दाखल होण्याची शक्यता आहे. पावसाळा जवळ आल्यास अवकाळी पाऊस सक्रिय होऊन वातावरण आबादानी होते. परंतु, हवामान तज्ज्ञांचा अंदाज नेहमी खरा ठरत नाही. पावसाळ्याच्या मार्गात काही अडथळा आल्यास नागरिकांना दमट वातावरणाचा सामना करावा लागतो. २०२५ मध्ये विदर्भात तब्बल ८८६.४ मिलिमीटर पाऊस कोसळला. हा पाऊस सरासरीच्या ४ टक्के अधिक होता. जून ते सप्टेंबरदरम्यान विदर्भातील सर्व ११ जिल्ह्यांमध्ये समाधानकारक पावसाची नोंद झाली. काही ठिकाणी तर अतिवृष्टीची नोंद करण्यात आली. अनेक ठिकाणी ढगफुटीसदृश पाऊस कोसळला. अशाही परिस्थितीत २०२६ चा उन्हाळा विदर्भवासीयांची परीक्षा पाहणारा ठरत आहे. २०२५ मध्ये गडचिरोली जिल्ह्यात १,२३५.८ मिलिमीटर इतक्या पावसाची नोंद करण्यात आली. हा पावसाचा एकप्रकारे विक्रम ठरला. अन्य जिल्ह्यांतही कमी-अधिक प्रमाणात याच धर्तीवर पाऊस कोसळला. वर्धा, यवतमाळ आणि वाशीम जिल्ह्यात तर ऑगस्ट महिन्यात पावसाने हाहाकार उडवून दिला होता. तरीही प्रखर उन्हाळा का जाणवत आहे? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

विदर्भात प्रखर उन्हाळा तापण्याची अनेक कारणे आहेत. यातील विदर्भ हा प्रदेश समुद्र किनाऱ्यापासून दूर असणे हे एक प्रमुख कारण आहे. विदर्भ महाराष्ट्राच्या पूर्वेला आहे. परिणामी, हा प्रदेश पश्चिम घाटाच्या रेन शॅडो झोनमध्ये येत नाही. त्यामुळे उन्हाळ्यात तापमान वाढते. शिवाय उन्हाळ्यात विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांत सूर्याची किरणे थेट पडतात. त्यामुळे पोळून काढणाऱ्या उन्हाचा सामना येथील नागरिकांना करावा लागतो. उष्माघातामुळे मागील दोन दशकांत विदर्भात ५०० पेक्षाही अधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. यात २०१६ आणि २०२२ मध्ये सर्वाधिक बळी गेले. यंदा विदर्भात नेमके किती मृत्यू उष्माघातामुळे झाले, याबाबतची अधिकृत आकडेवारी उपलब्ध नाही. परंतु, दरवर्षी विदर्भात उन्हामुळे बळी जातात, ही बाब कोणीही नाकारू शकत नाही. मे महिन्याची सुरुवात ढगाळ वातावरणाने झाली. शिवाय काही ठिकाणी तुरळक पावसाची नोंद करण्यात आली. अवकाळी पावसाचे ढग खूप उंचीवर असतात. त्यामुळे या काळात गारपिटीची शक्यता वाढते. काही ठिकाणी अद्याप ढगाळ वातावरण कायम आहे. त्यामुळे अवकाळी पावसासोबत गारपिटीचा धोका आहे. त्यानंतर मात्र पुन्हा उन्हाचा जाच वाढण्याची शक्यता आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

अमोल पुसदकर

# भय आणि वास्तवाचे चिंतन

नुकतेच नोएडा येथे कामगारांद्वारा पगारवाढीच्या मागण्यांसाठी हिंसक आंदोलन करण्यात आले. यामध्ये अनेक कंपन्यांवर दगडफेक करण्यात आली, रस्त्यावर उभ्या असलेल्या गाड्या फोडण्यात आल्या, जाळपोळ करण्यात आली. पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. दीडशेपेक्षा अधिक कामगारांना बंदी बनवण्यात आले. याचा तपास पोलिस आता करत आहेत. त्यामध्ये असे लक्षात आले आहे की घटनेच्या काही दिवसांपूर्वीच कामगारांना चिथावणी देण्याचे प्रकार व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून सुरू होते आणि त्याचा स्फोट एका दिवशी करण्यात आला. दीडशेपेक्षा अधिक लोकांना तुरुंगवास झालेला आहे. यामध्ये विदेशी शक्तींचा हात आहे का, हे सुद्धा शोधले जात आहे.

या घटनेचा विचार आपण केला, तर असे लक्षात येते की ज्या कंपन्यांमध्ये आपण काम करतो, ज्यांच्या भरवशावर अनेक वर्षांपासून आपले घर चालविले जात आहे, आपली मुलंबाळं शाळेमध्ये शिकत आहेत, त्याच कंपनीवर दगडफेक करणे, त्यांचे नुकसान करणे हे कितपत योग्य आहे, याचा विचार सर्वसामान्य कामगारांनी करणे आवश्यक आहे. कोणीही असो, पण ते आपल्या इतक्या जवळचे कसे झाले? त्यांच्या आवाहनावर आणि आश्वासनावर इतका आपला विश्वास कसा काय बसतो? हा सुद्धा प्रश्न आहे. कामगारांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असणे हे एक कारण असू शकते. कंपनी व्यवस्थापनाच्याद्वारे वारंवार त्यांचे होणारे शोषण हे सुद्धा कारण असू शकते. आपला पगार वाढला पाहिजे, ही भावना मनामध्ये असणे हे पण एक कारण असू शकते. परंतु आंदोलन सुरू झाल्याबरोबर लगेचच उत्तर प्रदेश सरकारने २० टक्के पगारवाढीची गोष्ट केली. हिंसक आंदोलन करण्यापेक्षा, जर सर्वच कंपन्यांमधील कामगारांनी सुट्टीच्या दिवशी एकत्र येऊन काही लाख कामगारांचा एक भव्य मोर्चा काढला असता आणि सरकारला आपले निवेदन दिले असते, तरीसुद्धा इतकी मोठी व्होट बँक म्हणजे मतदार नाराज आहे हे पाहून कुठल्याही सरकारने ताबडतोब यावर कारवाई केलीच असती. त्यासाठी हिंसेचा आधार घेणे कितपत योग्य होते? आज ज्यांना तुरुंगवास झालेला आहे, त्यांचे कुटुंब कसे चालेल? व्हॉट्सॲप ग्रुपवरची चिथावणी देणारे ते चालवतील का? आणि चालवतील तरीसुद्धा किती दिवस? उद्या त्यांनी आपला व्हॉट्सॲप नंबर बंद केला, तर ''कोणी आम्हाला मेसेज केले,'' याबद्दल आम्ही काय सांगू शकणार? याचाही विचार केला पाहिजे. त्यांनी सांगितलेली त्यांची नावे



कितपत खरी आहेत, हे सुद्धा किती कामगारांनी तपासून पाहिले असेल? त्यांचा कामगार चळवळीचा अभ्यास किती आहे? किती वर्षांपासून ते कामगार चळवळीमध्ये काम करत आहेत? ज्या संघटनेचे ते नेतृत्व करत आहेत, त्या संघटनेचा इतिहास काय आहे? या सर्व गोष्टी तपासून पाहण्याची गरज कामगारांना का वाटत नाही, हे सुद्धा एक चिंतेचे कारण आहे.

अनेक वेळा पगारवाढ, पेन्शन अशा मुद्यांवर अनेक कामगार नेते कामगारांना भडकविण्याचे काम करीत असतात. त्यांची पोळी शेकली जाते, त्यांना मोठी पदे मिळतात, काही लोक आमदार, खासदार सुद्धा होतात; पण ऊस तोडणारा मजूर हा त्याचेच काम करीत असतो आणि त्यांचा नेता हा फॉर्च्युनर गाडीमध्ये फिरत असतो. त्यामुळे कामगारांनी हे लक्षात घेतले पाहिजे की नेते हे त्यांना आकर्षक आश्वासन देऊ शकतात, आकर्षक जीवन नाही. मग आकर्षक जीवन कोण देऊ शकतो, याचा शोध घेणे आवश्यक आहे.

कोरोनानंतर जगाचा चीनवरील विश्वास मोठ्या प्रमाणावर डळमळीत झालेला आहे. ज्या देशांमध्ये वीज, पाणी, मुबलक जमीन, मनुष्यबळ उपलब्ध असेल, त्या देशांमध्ये आपले कारखाने टाकण्यासाठी जगातील मोठमोठ्या कंपन्या सुरक्षित भूमीचा शोध घेत आहेत. परंतु हे लक्षात घेतले पाहिजे की त्यांना मनुष्यबळ म्हणजे केवळ माणसं नको आहेत, तर त्यांना कुशल कामगारांची आवश्यकता आहे. कुशल कामगार म्हणजे काय? तर कुठल्याही कंपनीमध्ये जे काही काम होते, ज्या काही मशीन आहेत, उपकरणे आहेत, त्या सर्वांचा उपयोग करत, त्यांचे योग्य संचालन करीत उत्पादन काढू शकणारा कामगार म्हणजे कुशल कामगार आहे.

नागपूरमध्ये एक विमानांचे सुटे भाग बनविणारी कंपनी आहे. त्या कंपनीने नागपुरातील एका औद्योगिक प्रशिक्षण संस्थेशी करार केला आहे. त्या संस्थेने सुद्धा विमान कंपनीमध्ये चालणारे कार्य समजून घेत, त्यांना कोणते काम करायला कसे कुशल कामगार पाहिजेत हे त्यांच्याकडून जाणून घेतले आणि त्यानंतर आपल्या संस्थेत तशा पद्धतीचा अभ्यासक्रम सुरू केला. आता त्यांच्या संस्थेत दरवर्षी उत्तीर्ण होणारे सर्व विद्यार्थी हे त्या विमान कंपनीत घेतले जातात. त्याचप्रमाणे भारतामध्ये तशा पद्धतीचा अभ्यासक्रम फार कुठे नसल्यामुळे इतरही विमान कंपन्या त्यांच्याकडील विद्यार्थ्यांना मागत आहेत. यावरून आपल्या काय लक्षात येते? की रोजगार आहे; परंतु त्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ देणे हे प्रशिक्षण संस्थांचे कार्य आहे. आता जे कामगार अशा संस्थांमध्ये जाऊ शकत नाहीत, ज्यांचे वय सुद्धा जास्त झालेले आहे, त्यांनी काय करावे असा प्रश्न समोर येऊ शकतो. त्यांनी आहे त्या कंपनीमध्ये अधिकाधिक गोष्टी मला कशा शिकता येतील, याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे.

नागपुरातील एका विमानाचे सुटे भाग बनविणाऱ्या कंपनीमध्ये असताना, तेथे काही कुशल व अकुशल कामगार विविध विभागांमध्ये काम करीत होते. त्यावेळेस ज्यांचे आयटीआय झालेले नव्हते, फक्त दहावी किंवा बारावीच्या भरवशावर ते तिथे लागलेले होते, अशा मुलांना प्रेरणा देऊन त्यांना आयटीआय करायला लावले. ज्यांचे आयटीआय झालेले होते, अशा विद्यार्थ्यांना कंपनीची परवानगी घेऊन डिप्लोमा करण्यासाठी लावले. आता ते सर्व ऑफिसर झालेले आहेत. मला असं वाटते की सामाजिक प्रतिष्ठा, मान-सन्मान, पैसे वाढविण्यासाठी स्वतःची शैक्षणिक आणि कामातील ज्ञान-गुणवत्ता वाढविणे सुद्धा आवश्यक आहे; हेच वास्तव आहे.

भयाचे राजकारण करणारे कितीही असो, परंतु स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवून नवनवीन संधी शोधणारे कामगार हे कधीच मागे राहणार नाहीत. नुकताच कामगार दिवस साजरा करण्यात आलेला आहे. या वास्तवाची जाणीव ठेवून आपण कामगार दिवस साजरा केला पाहिजे, असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### आरोपीला जन्माची अद्दल घडविण्याची गरज

रविवार तरुण भारत ३ मे च्या अंकातील 'बालिकेवर अत्याचार करून निर्घृण हत्या' ही नसरापूरची व तशीच म्हाळुंगे परिसरात ३ वर्षांच्या बालकाच्या अत्याचार व हत्येची बातमी, या दोन्ही खरोखरच मन सुन्न करणाऱ्या बातम्या आहेत. बालिकेच्या प्रकरणात ज्येष्ठ नागरिक तर मुलाच्या हत्या प्रकरणात अल्पवयीन आरोपी हे आणखीनच क्लेशदायक आहे. मुलीच्या अत्याचार व खून प्रकरणातील आरोपी तर यापूर्वी लिंगपिसाट कृत्यांच्या प्रकरणातील (पुतणीवरही अत्याचार) सराईत गुन्हेगार होता, पण जामिनावर सुटून मोकाट होता. त्यामुळे आता पहिल्याच प्रयत्नात आरोपी ठरलेल्यांना कायद्यातील पळवाटांच्या मार्गाने सुटका होऊ न देता आरोप सिद्ध झाल्यावर जन्माची अद्दल घडवणारी शिक्षा केलीच पाहिजे. पालकांनीही आपल्या पाल्यांना चांगल्या-वाईट स्पर्शाची, अनोळखी व्यक्तींना टाळण्याची शिकवण लहान वयातच देणे ही काळाची गरज आहे.

**श्रीपाद कुलकर्णी**/९४२२५१५६४०

### पुणे येथून वंदे भारत एक्सप्रेस सुरू व्हाव्यात!

पर्यटन क्षेत्रात सध्या फार मोठी संधी उपलब्ध आहे. नागरिक मोठ्या प्रमाणावर पर्यटनासाठी जात आहेत. म्हणून पुणे रेल्वे स्टेशनवरून पुढीलप्रमाणे वंदे भारत एक्सप्रेस सुरू होणे आवश्यक आहे. १) पुणे- इंदूर-पुणे (या रेल्वेमुळे मध्यप्रदेशमधील उज्जैन, ओंकारेश्वर, महेश्वर, मांडू, इंदूर या ठिकाणी पर्यटन विकास होईल.) २) पुणे-बडोदा-पुणे (या रेल्वेमुळे सरदार पटेल स्टॅच्यू ऑफ युनिटी, गरुडेश्वर, मोघेंच्या, बडोदा, अहमदाबाद या ठिकाणी पर्यटन विकास होईल) ३) पुणे- गोवा-पुणे. या रेल्वेमुळे गोवा, कारवार इ. ठिकाणी पर्यटनात मोठी वाढ होईल. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मध्यप्रदेश, गुजरात, गोवा या राज्यांतूनही पर्यटक मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रातील गड किल्ले, प्रेक्षणीय स्थळे पाहण्यासाठी येतील. म्हणून या मार्गावर रेल्वे मंत्रालयाने वंदे भारत एक्सप्रेस गाड्या सुरू कराव्यात. पुणे व परिसरातील लोकप्रतिनिधींनी यासाठी पाठपुरावा करावा ही विनंती.

**मोहन रानडे**/पुणे. ९८२३३७५३००

## वाचक पत्रे

### नागपूर मनपाने जनतेच्या प्रश्नाकडे लक्ष द्यावे

नागपूर महानगर पालिकेच्या अंतर्गत असलेल्या अनेक वसाहतींमध्ये अमृत वाहिनी योजनेअंतर्गत काम सुरू आहे. अगदी रस्त्याच्यामधून पाईप टाकून ही योजना राबविणार आहे. योजना चांगली आहे. जनतेच्या घरात पावसाचे पाणी जाणार नाही याची खबरदारी म्हणून ही योजना सुरू आहे. या योजनेच्या कामाला कालबद्ध कार्यक्रम असणे आवश्यक आहे. रवींद्रनगरमध्ये गेल्या ४ महिन्यांपासून काम सुरू आहे. रवींद्रनगरच्या पाटीपासून पूर्ण रस्ता उखडून टाकून तो रस्ता पूर्णपणे बंद केला आहे. आता पाईपलाईन टाकली तरी तो उखडलेला रस्ता तसाच आहे. काम झाल्यावर रस्ता पूर्ववत करावा ही माफक अपेक्षा आहे. तिथे अनेक दुचाकीस्वार पडलेले आहेत. त्यांना इजा झाली आहे. तसेच काम करीत असताना नळाची पाईपलाईन फुटली. त्यातूनही बरंच पाणी वाहून गेलं. प्रत्येक गल्लीमध्ये कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. अनेक चेम्बर्स उघडे आहेत. रात्री कोणाचाही अपघात होऊ शकतो.

आपण 'स्वच्छ नागपूर सुरक्षित नागपूर' या दृष्टीने बघण्याचा प्रयत्न करतो. दोन महिन्यांपूर्वी राधे मंगलम चौकात तीन अपघात झालेत तेव्हा तिथे तात्पुरता सिग्नल लावला. परंतु तो नेहमी बंदच असतो. अशा अनेक गोष्टी निदर्शनास येतात तेव्हा नागपूर महानगर पालिकेला विनंती आहे की त्यांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. आम्ही जनता म्हणून सुद्धा मनपाला सहकार्य करू ही खात्री आम्ही देतो. करिता वसाहतीतील नागरिक व मनपा प्रशासन दोघे मिळून स्वच्छ नागपूर, सुरक्षित नागपूर ही संकल्पना राबवू शकतो. आमचे नगरसेवकही आमच्या तक्रारींची ताबडतोब दखल घेतातच, परंतु काही तक्रारी मनपा प्रशासनच सोडवू शकते. त्यामुळे मनपाला नम्र विनंती आहे की लक्ष्मीनगर झोनमधील रवींद्रनगर वसाहतीची समस्या सोडवावी.

**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

### मृत्युदंड शिक्षेची अंमलबजावणी होणे आवश्यक

बलात्कार करून निर्घृण हत्या असो की इतर कुठल्याही गंभीर गुन्ह्यातील मानवतेला कालिमा फासणारी हत्या असो अशा प्रकरणातील बऱ्याच प्रकरणात मृत्युदंडाची शिक्षा आरोपीला होते. प्रकरण ताजे असताना जनतेचा रोष, समाज माध्यमांवरून अल्प काळ पाठपुरावा वगैरे होतो, परंतु पुन्हा नवीन घटना घडली की जुन्या प्रकरणाचा विसर पडतो हे सत्य आहे. खालच्या न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत अनेक वर्षे खटले सुरू असतात. सर्वोच्च न्यायालय गंभीर प्रकरणातही मृत्युदंडाऐवजी जन्मठेप अशी शिक्षा देते. बरे मृत्युदंड कायम ठेवला तरीही मग राष्ट्रपतींकडे दयेचा अर्ज मग पुढे शिक्षा अंमलबजावणीस उशीर झाला म्हणून मृत्युदंड रद्द असेही घडते आणि गुन्हा घडला त्यावेळेसचा जनतेचा रोष विरलेला असतो. त्यामुळे मृत्युदंडाचा निर्णय झाल्यास कुठलीही दयामाया न दाखवता अतिशय अल्प काळात आरोपी कसा फासावर लटकेल यावर विचार होणे आवश्यक आहे.

**राम राजे**/९४२१७७९९४५

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हरकी निमगांव शाळेतील शिक्षकांची सेवा प्रेरणादायी व कौतुकास्पद ; गटशिक्षणाधिकारी सय्यद हकीम

## सेवानिवृत्तीबद्दल मुख्याध्यापक व शिक्षकांचा सत्कार



तभा. वृत्तसेवा

**माजलगाव, प्रतिनिधी** | निष्ठेने कार्य केल्यास सर्व गाव शिक्षकांसोबत उभे राहते याचे उत्तम उदाहरण हरकी निमगांव जिल्हा परिषद शाळेत दिसुन येते. हरकी निमगांव शाळेतील शिक्षकांची सेवा प्रेरणादायी व कौतुकास्पद असल्याचे गटशिक्षणाधिकारी सय्यद हकीम यांनी सांगीतले.

हरकी निमगांव जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक पी. जी. देशपांडे व शिक्षक सत्यभान भुंबे यांच्या सेवानिवृत्तीबद्दल आयोजित सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी समाधान शिंदे हे तर उद्योजक गोविंद बजाज, इंजि. सुधाकर घुबडे, सत्यप्रेम खोटे, काळे सर, सातत्य कोचिंग क्लासेसचे संचालक बी. एन. कुलकर्णी, डॉ. दत्तात्रय पारगांवकर, शिक्षक नेते रमेश फपाळ, नितीन काळे, उमाकांत सोळंके, अरूण इंगळे, भागवत खुळे, सखाराम शिंदे, एसएमसी अध्यक्ष रामेश्वर शिंदे, आसाराम नवगरे, सरपंच राजेभाउ नवगरे, चेअरमन बबन शिंदे, गणेश गिरी, राजेभाउ कोल्हे, हनुमंत कोल्हे, विक्रम रंजवे, दत्ता बोबडे यांची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाले, श्रीफळ, फेटा, भेटवस्तु देत देशपांडे दाम्पत्य व भुंबे दाम्पत्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देतांना मुख्याध्यापक देशपांडे म्हणाले की, प्रामाणिकपणे कार्य केल्यास लोकसहभागातुन शाळेचा कायापालट होतो. शाळेतील आठ वर्षाच्या कार्यकाळात एबीपी माझा मुंबई, रोटरी क्लब माजलगाव, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा प्रथम क्रमांक आदी सामाजिक उपक्रमात शाळेने सहभाग नोंदवुन पारितोषीके प्राप्त केली असुन यासाठी शाळेतील सर्वच शिक्षकांचे योगदान मोलाचे ठरले. यावेळी अशोक वाडेकर, सरपंच यादव, श्री. ईनामदार, मनोज सोळंके, श्री. खेत्री यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सावरगाव केंद्रातील प्रल्हाद दळवी, शिवाजी लव्हाळे, भारत राउत, भिमराव राठोड, अनिल राठोड, कविता आउलवार, गणेश भदर्गे, श्री. मुळे, श्री. मेंडके, भिमाशंकर राठोड व सर्व शिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती व समस्त ग्रामस्थ हरकी निमगांव यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन प्रमोद काळे, लक्ष्मण सरवदे यांनी केले तर आभार गणपती ढवळे यांनी मानले. कार्यक्रमास हरकी निमगांव व पंचक्रोषीतील ग्रामस्थांची लक्षणीय उपस्थिती होती.

# नसरापूर प्रकरणातील नराधमाला तात्काळ फाशीची शिक्षा द्या,परळीतील नागरिक आक्रमक

## घटनेच्या निषेधार्थ आज करणार रास्ता रोको



तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ** | नसरापूर येथे एका नराधमाने चार वर्षीय मुलीवर अत्याचार करून तिची निर्घुण हत्या केली होती या प्रकरणा विरोधात आता नागरिकांच्या तीव्र भावना दिसून येत आहेत.या घटनेच्या निषेधार्थ आज परळीतील छत्रपती संभाजी महाराज चौकात सकाळी रास्ता रोको आंदोलन केले जाणार आहे. या प्रकरणातील नराधमाला छत्रपती शासनाप्रमाणे शिक्षा करावी अशी मागणी देखील यावेळी नागरिकांनी केलीय.

याबाबत अधिक माहिती अशी की, नसरापूर येथे एका नराधमाने चार वर्षीय चिमुरडीवर अत्याचार करत तिची निर्घृण हत्या केली. या दुर्दैवी घटनेच्या निषेधार्थ काल दिनांक ३ मे रोजी समस्त परळीकरांनी या प्रकरणातील नराधमाला तात्काळ फाशीची शिक्षा करावी अशी मागणी केली आहे. या घटनेच्या निषेधार्थ आज परळी येथील छत्रपती संभाजी महाराज चौकात रास्ता रोको केले जाणार आहे. दरम्यान असे वातावरण असल्यास आम्ही आमच्या मुलींना बाहेर कसे सोडायचे असा सवाल देखील यावेळी आंदोलनकर्त्यांकडून सरकारला विचारण्यात आला आहे. दरम्यान याबाबतचे एक निवेदन परळी शहर आणि संभाजीनगर पोलीस ठाण्यात देण्यात आले आहे.

# स्वामी विवेकानंद शाळेमध्ये महाराष्ट्र दिनानिमित्त विविध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न

## याप्रसंगी एन.एम.एम.एस. शिष्यवृत्तीधारक ८ विद्यार्थ्यांचा तसेच इतर गुणवंतांचा सत्कार करण्यात आला



तभा. वृत्तसेवा

**केज** | प्रतिनिधी | जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर [ माध्यमिक विभाग ] या शाळेमध्ये दि. १ मे रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून विविध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, शाळेचे माजी मु. अ. बाळासाहेब तिडके, सेवानिवृत्त सहशिक्षक हनुमंत घाडगे, प्राचार्य शंकर भैरट, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभीस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी शाळेचे सेवानिवृत्त सहशिक्षक हनुमंत घाडगे यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले.

कार्यक्रमाच्या पुढील सत्रात शाळेतील विविध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ८ वी एन. एम. एम. एस. शिष्यवृत्तीधारक, विज्ञान प्रदर्शन स्पर्धेतील गुणवंत, शालेय मंत्रिमंडळातील उत्कृष्ट कार्य करणारे गुणवंत, तसेच इयत्ता ५ वी ते ११ वी वर्गातील गुणानुक्रमे आलेल्या विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या एन.एम. एम. एस. या परीक्षेची निवड यादी दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध झालेली आहे.

# केकतसारणी येथे ७ मे रोजी राष्ट्रचिंतन अभियान अंतर्गत चर्चासत्राचे आयोजन

## कृषी,आरोग्य आणि शिक्षण विषयावर रंगणार चर्चा ; महर्षी गज अरविंदजींची प्रमुख उपस्थिती



तभा. वृत्तसेवा

**केज** | प्रतिनिधी | केज तालुक्यातील केकतसारणी येथे हिंदराष्ट्र ऑर्गनायझेशन संस्थेच्या वतीने 'राष्ट्र चिंतन अभियान'अंतर्गत येत्या गुरुवारी,७ मे २०२६रोजी विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमात कृषी,आरोग्य आणि शिक्षण या तीन महत्त्वाच्या विषयांवर सखोल मार्गदर्शन आणि चर्चा होणार आहे.

कार्यक्रमाची रूपरेषा

हे चर्चासत्र केकतसारणी येथील मारुती मंदिर सभागृहात सकाळी ९ ते ११ या वेळेत संपन्न होईल.या सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून महर्षी गज अरविंदजी उपस्थित राहणार असून, त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ परिसरातील नागरिकांना घेता येणार आहे.

तज्ज्ञांचे मार्गदर्शन व प्रश्नोत्तर सत्र

या चर्चासत्रात कृषी, आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रातील विविध मान्यवर आपली मते मांडणार आहेत. केवळ मार्गदर्शनच नव्हे,तर नागरिकांच्या मनातील शंका दूर करण्यासाठी विशेष प्रश्नोत्तर सत्राचे आयोजनही करण्यात आले आहे.यामध्ये उपस्थित नागरिक आपले प्रश्न मांडू शकतील आणि मान्यवर त्यांचे निरसन करतील.राष्ट्र उभारणीत कृषी,आरोग्य आणि शिक्षण हे तीन आधारस्तंभ आहेत. या विषयांवर जनजागृती व्हावी आणि नागरिकांच्या समस्यांना व्यासपीठ मिळावे,या उद्देशाने या चर्चासत्राचे आयोजन केले आहे, अशी माहिती हिंदराष्ट्र संघाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षा सौ.राधाताई सपकाळ यांनी दिली. या महत्त्वपूर्ण चर्चासत्राला केकतसारणी व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# निस्वार्थ सेवा आणि सामाजिक बांधिलकीमुळेच 'तुलसी' ला यश मिळाले : पुज्य भदंत डॉ.उपगुप्त महाथेरो

## तुलसी फॅशन कॉलेजच्या नूतन वास्तू व 'तुलसी क्रिएशन' शोरूमचे दिमाखात उद्‌घाटन संपन्न



तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी)** | प्रा.प्रदीप रोडे यांनी निस्वार्थ सेवाभाव, नैतिकता, शील आणि सदाचार या मूल्यांच्या आधारावर उभारलेले तुलसी शैक्षणिक संकुल आज सामाजिक परिवर्तनाचे प्रेरणास्थान ठरले आहे. केवळ पैशाने नव्हे, तर समाजासाठी वेळ, बुद्धी आणि संपत्ती खर्च केल्यानेच खरे यश प्राप्त होते. प्रा.प्रदीप रोडे यांनी आपल्या कार्यातून हाच आदर्श समाजासमोर उभा केला आहे, असे प्रतिपादन पुज्य भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी केले.

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनच्या नूतन इमारतीचे तसेच 'तुलसी क्रिएशन – द कम्प्लीट वुमन्स ड्रीम वर्ल्ड' या शोरूमचे उद्घाटन रविवारी (दि. ३ मे) मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी ते मुख्य उद्घाटक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाचा प्रारंभ पूज्यनीय भिक्खू संघाच्या मंगल मैत्रीत आणि बुद्धवंदनेने झाला. यावेळी पुज्य भदंत करुणानंद महाथेरो आणि पुज्य भदंत धम्मशील थेरो यांनी मंगल आशीर्वाद दिले. या ऐतिहासिक सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून मा.रवींद्र जोगदंड, मा.दीपक कदम, मा.डॉ. सिद्धार्थ जोंधळे, मा.सुरेश लोंढे, मा.सुदिन गायकवाड, मा.सुधाकर बनटे, मा.संदीप उपरे, मा.पी.टी .मुने, मा.रविंद्र कोलप, मा.दीपा रोडे तसेच प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे यांच्यासह अनेक प्रशासकीय अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना पुज्य भदंत करुणानंद महाथेरो म्हणाले की, प्रा.प्रदीप रोडे यांच्या हातून आदर्श शैक्षणिक कार्य घडत आहे.

# महाराष्ट्राच्या प्रगतीला महानिर्मितीची ऊर्जा : परळी केंद्रातील संच क्र. ६ चा ऐतिहासिक उच्चांक - मुख्य अभियंता सुनील इंगळे

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन उत्साहात



तभा. वृत्तसेवा

**परळी वैद्यनाथ** | महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात महानिर्मितीचा मोलाचा वाटा असून राज्याच्या औद्योगिक, कृषी आणि सामाजिक प्रगतीसाठी अखंडित वीजपुरवठा अत्यंत महत्त्वाचा आहे. परळी औष्णिक विद्युत केंद्रातील सर्व संच सध्या पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. विशेष म्हणजे संच क्रमांक ६ ने सलग १४० दिवस पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती करून ऐतिहासिक उच्चांक प्रस्थापित केला असून महाराष्ट्राच्या प्रगतीला महानिर्मितीची ऊर्जा प्रदान केली आहे," असे प्रतिपादन परळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे यांनी केले.ते ६६ व्या महाराष्ट्र दिन तसेच जागतिक कामगार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

परळी औष्णिक विद्युत केंद्रात गुरुवार दि. १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्य अभियंता सुनील इंगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थित अधिकारी, कर्मचारी, कामगार तसेच कंत्राटी कामगारांनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत गाऊन अभिवादन केले.

यावेळी बोलताना सुनील इंगळे यांनी परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. केंद्रातील सर्व अधिकारी, कर्मचारी, कामगार आणि कंत्राटी कामगार यांच्या समन्वय, मेहनत आणि निष्ठेमुळेच ही उल्लेखनीय कामगिरी शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले. संच क्रमांक ६ ने सलग १४० दिवस पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती करून केंद्राच्या कार्यक्षमतेचा नवा आदर्श निर्माण केला आहे. भविष्यातही महाराष्ट्राच्या विकासासाठी महानिर्मिती अधिक प्रभावी योगदान देत राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास उपमुख्य अभियंता महेश महाजन, अधीक्षक अभियंता राजू रेड्डी, संभाजी बुकतारे, धनंजय कोकाटे, प्रसन्नकुमार गरुड, गोस्वामी, मदन पवार, सुरक्षा विभागाचे वरिष्ठ व्यवस्थापक बी. आर. अंबड, मेस्कोचे गौतम गायकवाड, वैशाली ठोंबरे, सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड, कामगार नेते हरिराम गित्ते, सोपान चौधर, बप्पा वडमारे, व्यंकटराव रामोड, के. एच. गित्ते मॅडम, ज्योती राख आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू गाजले यांनी केले. महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे परळी औष्णिक विद्युत केंद्र परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.




# प्रशासकीय अनास्था : परळीत छत्रपती संभाजी महाराज स्मारकाची दुरवस्था

## महादेव गंगणे पाटील यांचा तीव्र आंदोलनाचा इशारा



तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** | शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या आणि करोडो शिवभक्तांचे प्रेरणास्थान असलेल्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या परळीतील स्मारकाची सध्या मोठी दुरवस्था झाली आहे. प्रशासनाच्या या उदासिनतेमुळे स्थानिक नागरिकांसह शिवप्रेमींमध्ये प्रचंड संतापाची लाट उसळली असून, स्मारकाची तातडीने डागडुजी आणि स्वच्छता करण्याची मागणी केली जात आहे. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शहराध्य महादेव गंगणे पाटील यांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

परळी शहरातील छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा आणि परिसर सध्या देखभालीअभावी अतिशय दयनीय अवस्थेत आहे. स्मारकाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात सर्वत्र कचरा आणि घाणीचे साम्राज्य पसरले आहे. पुतळ्याच्या चौथऱ्याची पडझड झाली असून, रात्रीच्या वेळी या ठिकाणी पुरेशी दिवाबत्ती नसल्याने परिसरात अंधार असतो. एकीकडे महापुरुषांच्या नावाने राजकारण केले जात असताना, दुसरीकडे त्यांच्या स्मारकांकडे होणारे हे दुर्लक्ष प्रशासनाचे अपयश असल्याची टीका गंगणे यांनी केली आहे.

पुतळा जेव्हा बसवला गेला तेव्हा सत्ताधारी आणि मा. नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांच्या सह त्यांच्या सहकाऱ्यांनी एक महिन्यात सुशोभीकरण करू अशा घोषणा करत प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न केला होता. परंतु प्रत्यक्षात परिस्थिती पूर्ण उलटी असल्याची प्रतिक्रिया महादेव गंगणे पाटील यांनी दिली आहे.

स्थानिक शिवप्रेमींनी अनेकवेळा नगर पालिकेकडे या संदर्भात तक्रारी केल्या आहेत. मात्र, प्रशासनाकडून केवळ आश्वासने दिली जात असून प्रत्यक्षात कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. "स्वराज्यरक्षकांचे स्मारक ही आमची अस्मिता आहे, त्याची अशी अवस्था पाहणे क्लेशदायक आहे," अशा भावना शिवप्रेमींसह महादेव गंगणे पाटील यांनी व्यक्त केल्या आहेत. या स्मारकाची नियमित स्वच्छता व्हावी, परिसराचे सौंदर्यीकरण करावे आणि सुरक्षेसाठी रक्षक नेमावा, अशा मागण्या केल्या आहेत. जर येत्या काही दिवसांत स्मारकाची स्थिती सुधारली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही महादेव गंगणे पाटील यांनी दिला आहे. आता तरी नगर परिषद प्रशासन या गंभीर विषयाकडे लक्ष देणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार असल्याचे गंगणे पाटील यांनी म्हटले आहे.

बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी रविवारी के १०० वर्ष– नए क्षितिज' या विषयावरील सरसंघचालकांचे संघटन, समित्या, कार्यपद्धती आहेत. त्यांनी सल्ला, मार्गदर्शन ते मूळचे स्वयंसेवक आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचे पुण्य त्यांच्याकडे आमच्यावर येते, ते आम्ही घेतो. कारण ते मुळात इथून गेले. तेवढा सभागृहात टाळ्यांचा कडकटाट झाला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# छत्रपती शिवाजी महाराज सेवा प्रतिष्ठानतर्फे २१ जोडपी विवाहबध्द

## डॉ. अजय मुंदडा यांचा पुढाकार, सर्व स्तरातून स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ४ मे**

वाढत्या महागाईच्या काळात सर्वसामान्य कुटुंबांवर लग्नाचा वाढता आर्थिक बोजा लक्षात घेऊन, वसमतमध्ये सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण पाहायला मिळाले. 'श्री छत्रपती शिवाजी महाराज सेवा प्रतिष्ठान' यांच्या वतीने आयोजित २१ वधू-वरांचा भव्य सामूहिक विवाह सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात पार पडला.

या सोहळ्याचे प्रमुख आयोजक डॉ. अजय जयप्रकाश मुंदडा यांनी घेतलेला पुढाकार सध्या संपूर्ण तालुक्यात चर्चेचा आणि कौतुकाचा विषय ठरला आहे. अवाजवी खर्चाला आळा घालून सामान्य कुटुंबांतील युवक-युवतींचे संसार सुखाने उभे राहावेत, या उदात्त हेतूने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

वैद्यकीय सेवेसोबतच सामाजिक उत्तरदायित्व जपत डॉ. मुंदडा यांनी उचललेले हे पाऊल विशेष उल्लेखनीय ठरले. या सोहळ्यास माजी सहकार मंत्री जयप्रकाश मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर, राजकीय नेते, व्यापारी, शेतकरी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी आयोजकांचे मनापासून कौतुक करत, हा केवळ विवाह सोहळा नसून समाजजागृतीची चळवळ आहे, अशा भावना व्यक्त केल्या. सर्व २१ जोडप्यांचे विवाह अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.

महागाईच्या पार्श्वभूमीवर पालकांवरील आर्थिक ताण मोठ्या प्रमाणात कमी झाला. हजारो नागरिकांनी उपस्थित राहून नवदांपत्यांना शुभाशिर्वाद दिले. यावेळी बोलताना डॉ. अजय मुंदडा म्हणाले,सामान्य माणसाच्या सुख-दुःखात सहभागी होणे हेच आमचे कर्तव्य आहे. शेतकरी व कष्टकरी बांधवांवरील आर्थिक भार कमी व्हावा, या उद्देशानेच हा उपक्रम राबवला. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

# शिवाजी राजे जाधव यांचेहस्ते जायंटस् ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मे**

येथील शिवाजीराव देशमुख सभागृहाते आयोजित कार्यक्रमात शिवाजी राजे जाधव यांचेहस्ते जायंटस ग्रुप यांचे पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. शिव शंभो प्रतिष्ठान हिंगोली यांच्या वतीने आयोजित नवनिर्वाचित खासदार रामराव वडकुते यांचे भव्य नागरी सत्कार कार्यक्रमात जायंटस ग्रुपचे जिल्हाध्यक्ष डॉ. नामदेव कोरडे, डॉ. संजय नाकाडे, रत्नाकर महाजन, संजय खिल्लारे, निळकंठ गायकवाड, विनाताई देशमुख, मंगलाताई आळणे संजय घन आदींचा जिजाऊ मासाहेब यांचे सोळावे वंशज शिवाजी राजे जाधव सिंदखेडराजा यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

हिंगोली शहरात स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, मतदार जनजागृती, सायकल रॅली, आरोग्य शिबिरे योग संगीत शिक्षण व इतर सामाजिक कार्यात सातत्याने अनेक वर्ष केलेल्या कामगिरीची दखल घेऊन हा सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा हिंगोली चे पालकमंत्री नामदार नरहरी झिरवळ तर प्रमुख पाहुणे म्हणून सिंदखेड राजा येथील जिजाऊ मा साहेबांचे माहेरचे सोळावे वंशज शिवाजी राजे जाधव तसेच नूतन खासदार रामराव वडकुते, आमदार हेमंत पाटील आमदार तानाजी मुटकुळे, आमदार राजू नवघरे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, भाजपाचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष दिलीपराव चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष शेख निहाल काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरेश अप्पा सराफ, तहसीलदार श्रीकांत भुजबळ वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अनिल पतंगे मुनीर पटेल वकील संघाचे अध्यक्ष ॲड.श्रीधर घुगे, यांचे सह कार्यक्रमास हिंगोलीकर नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. यावेळी सुर संगम हिंगोली यांच्यातर्फे राष्ट्रभक्तीपर बहारदार गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. जायंटस ग्रुप हिंगोली यांच्या वतीने शिव शंभो प्रतिष्ठानचे अध्यक्ष कल्याणराव देशमुख व सर्व पदाधिकारी यांचे,आयोजकांचे आभार व्यक्त करून कार्यक्रम संपन्न झाला.

# केंद्र सरकारच्या उच्चस्तरीय समितीवर आ. डॉ. प्रज्ञा सातव



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मे**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची आगामी २०० वी जयंती २०२६ ते २०२८ पर्यंत राष्ट्रव्यापी स्तरावर साजरी करण्यासाठी केंद्र सरकारद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली देशपातळीवर १२६ सदस्यांची एक उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. या अत्यंत महत्त्वाच्या आणि प्रतिष्ठित समितीत सदस्य म्हणून आ.डॉ.प्रज्ञाताई सातव निवड करण्यात आली.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांचा वारसा घराघरात पोहोचवण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमांची रूपरेषा ठरवण्यासाठी तसेच दोन वर्षांच्या या स्मरणोत्सवांतर्गत राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांचे संचलन आणि अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे व शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक समता या विषयांवर आधारित राष्ट्रीय कार्यक्रमाची आखाणी हि समिती करणार असून

या समितीत माजी राष्ट्रपती, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि देशातील सर्वोच्च धोरणकर्ते, पद्मश्री पुरस्कारार्थी, विविध तज्ज्ञ व प्रशासकीय अधिकारी यांचा समावेश आहे. फुले दाम्पत्याचा समतेचा विचार देशाला अधिक समृद्ध करण्यासाठी या माध्यमातून कटिबद्ध राहणार असल्याचे आ.डॉ. प्रज्ञाताई सातव यांनी सांगितले व या महत्त्वपूर्ण जबाबदारीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालय आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार त्यांनी मानले.



**हिंगोली– पश्चिम बंगाल, आसाम तसेच पाँडेचरी या राज्यात भारतीय जनता पक्षाने मोठा विजय प्राप्त केल्यानंतर हिंगोली येथील महात्मा गांधी चौकात भाजपच्यावतीने फटाक्यांची आतिषबाजी आणि मिठाई वाटप करून जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, गोवर्धन वीरकुंवर, विलास गोरे, बाबा घुगे, माणिक लोडे, नगरसेवक उमेश गुठ्ठे, सरचिटणीस उमेश नागरे, उपाध्यक्ष संजय ढोके, महेश शहाणे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते. छाया– विजय गुंडेकर**

# स्वच्छता कामगारांनी वेळेत कामावर हजर रहावे अन्यथा कारवाई– गटनेते श्रीराम बांगर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मे**

शहरातील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर होऊ नये आणि नागरिकांना आरोग्याच्या समस्या भेडसावू नयेत, यासाठी नगरपरिषदेच्या स्वच्छता कामगारांनी आपल्या निर्धारित वेळेत कामावर हजर राहून चोख कर्तव्य बजावावे. कामात कसूर करणाऱ्या किंवा विनाकारण दांडी मारणाऱ्या कर्मचाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा सज्जड इशारा नगरपरिषद शिवसेनेचे गटनेते श्रीराम बांगर यांनी दिला आहे.





येथील नगर परिषदेच्या सभागृहात सोमवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शहराच्या विविध प्रभागांमध्ये स्वच्छतेचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून काही कर्मचारी वेळेवर कामावर उपलब्ध राहत नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर श्रीराम बांगर यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. जनतेचे आरोग्य आमच्यासाठी प्राथमिकता आहे. जर स्वच्छता कर्मचारी वेळेवर आले नाहीत, तर कचरा साचून दुर्गंधी पसरते. त्यामुळे प्रत्येक कामगाराने बायोमेट्रिक हजेरी आणि नेमून दिलेल्या वेळेचे काटेकोर पालन करावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

स्वच्छता निरीक्षकांनीही प्रत्येक प्रभागात जाऊन कामगारांच्या उपस्थितीची नोंद घ्यावी, अशा सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. जे कर्मचारी वारंवार अनुपस्थित राहतील किंवा कामात टाळाटाळ करतील, त्यांच्यावर प्रशासकीय स्तरावर दंडात्मक तसेच शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असेही बांगर यांनी नमूद केले. पावसाळा जवळ येत असल्याने नाल्यांची सफाई आणि कचरा संकलन वेळेत होणे अत्यंत आवश्यक आहे. शहरात कुठेही कचऱ्याचे ढीग साचणार नाहीत याची काळजी स्वच्छता विभागाने घ्यावी. कर्तव्यात कसूर करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा अहवाल मुख्याधिकाऱ्यांकडे सादर करण्यात येईल, असेही यावेळी सांगण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी अरविंद मुंढे, उपनगराध्यक्ष माबूद बागवान, अभियंता प्रतीक नाईक यांच्यासह नगरसेवकांची उपस्थिती होती.

# गॅस एजन्सीच्या मनमानी कारभाराविरोधात ग्राहकांचा उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ४ मे**

शहरातील 'श्री साई सेवा गॅस एजन्सी'च्या मनमानी कारभाराविरोधात आता संतापाची लाट उसळली आहे. सामान्य ग्राहकांना गॅससाठी हेलपाटे मारायला लावणाऱ्या या एजन्सीवर कारवाई करण्याऐवजी पुरवठा विभागाने संशयास्पद शांतता बाळगल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महिनाभर गॅस नाही,ग्राहक त्रस्त.

काही ग्राहकांनी १७ मार्च २०२६ रोजी ऑनलाइन गॅस बुकिंग केले. मात्र महिनाभर उलटूनही सिलिंडर मिळाला नाही. एजन्सीकडे विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. एवढेच नव्हे तर एजन्सीच्या मालकांकडून अपमानास्पद वागणूक मिळाल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

काळाबाजाराचा संशय पैशाने गॅस तात्काळ टंचाईचे कारण सांगून सर्वसामान्यांना गॅस नाकारला जात असताना, २५ मार्च रोजी एका व्यक्तीकडून १३०० रुपये घेऊन सिलिंडर दिल्याचा आरोप समोर आला आहे. यामुळे एजन्सीत काळाबाजार सुरु असल्याचा संशय बळावला आहे.

हॉटेलवर छापा, एजन्सीवर मूकसंमती? काही आठवड्यांपूर्वी पुरवठा विभागाने हॉटेल व धाब्यांवर छापे टाकून घरगुती गॅस सिलिंडर जप्त केले होते. मात्र, जिथून हा गॅस पुरवला जातो त्या एजन्सीवरच कारवाई होत नसल्याने लहानांवर कारवाई, मोठ्यांना मोकळीक अशी टीका होत आहे. हा दुटप्पीपणा नेमका कोणाच्या संरक्षणाखाली चालतोय? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

तक्रारींनंतरही कारवाई शून्य १७ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात लेखी तक्रार करूनही अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे पुरवठा विभागाच्या निष्क्रियतेवर संशय अधिक गडद झाला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### आ. टी. राजासिंह यांनी घेतले नागनाथाचे दर्शन



हिंगोली– देशातील बारा ज्योतिर्लिंगापैकी आठव्या स्थानावर असलेल्या नागनाथ प्रभूचे सकाळी ११वाजता भाजपाचे तेलंगणातील( हैदराबाद) येथील गोशामहल मतदारसंघाचे आमदार टी. राजासिंह यांनी महापूजा करून दर्शन घेतले. यावेळी हेमाडपंथी दगडी शिल्पकलांची माहिती जाणून घेतली. महापूजा झाल्यानंतर देवस्थानच्यावतीने त्यांचा शाल, श्रीफळ व नागनाथ मंदिराची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. आमदार टी राजासिंह यांच्यासोबत अर्जुन शर्मा, हरीश ओझा, लक्ष्मण वैरल असून त्यांचा देखील सत्कार करण्यात आला.यावेळी देवस्थानचे व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, पोलिस निरीक्षक जी एस राहिरे,गार्डप्रमुख बबन सोनूने, कृष्णा पाटील, नवनाथ देशमुख, मंगेश गुरव, ऋषिकेश सोनूने, विक्की ठाकूर, गजानन राऊत, सोनू ठाकूर, अजय राऊत,सोनू लाड, नरेंद्र शिरसागर, ओम देशमुख, कुणाल देशमुख, नयन देशमुख, गोविंद राऊत आदी उपस्थिती होते.

# बारावीच्या निकालात निजामुद्दीन कुरेशी उर्दू कनिष्ठ महाविद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ४ मे**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा बारावी परीक्षेचा निकाल दि. २ मे २०२६ रोजी जाहीर झाला असून, वसमत शहरातील निजामुद्दीन कुरेशी उर्दू कनिष्ठ महाविद्यालयाने पुन्हा एकदा उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा ९० टक्के तर कला शाखेचा ७८ टक्के इतका समाधानकारक निकाल लागला आहे. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेच्या सक्षम व्यवस्थापनामुळे हे यश शक्य झाल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. विज्ञान शाखेत

प्रथम-आजका मसरत जाहैद शरीफ, द्वितीय-पठाण अर्शिया अमजद खान, तृतीय-अंशारा कैफ शेख तर कला शाखेत प्रथम-ताहेरा बुतुल निजामुद्दीन, द्वितीय-शेख अमरीन खैसर, तृतीय-पठाण तय्यबा असद खान यांनी क्रमांक पटकाविला आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेने महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले असून, पालक आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रियाजुद्दीन कुरेशी, उपाध्यक्ष मुजाहेद शाकेर, सचिव काफिया परवीन, तसेच रत्नमाला शिंदे, मसरूर अहमद खान, नदीमुद्दीन कुरेशी, रोमान कुरेशी आदी मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले.महाविद्यालयाचे प्राचार्य जावेद हाश्मी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. यावेळी जाधव, वाजेदा, लुबना, याहया आदी शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांचा सत्कार केला. यावेळी बोलताना प्राचार्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी प्रामाणिक परिश्रम, नियमित अभ्यास आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा योग्य उपयोग करून हे यश मिळवले आहे. भविष्यातही महाविद्यालय अशाच प्रकारे गुणवंत विद्यार्थ्यांची परंपरा पुढे नेईल.

# भर उन्हात ऊसाच्या फडाला वेढा, आरोपीला केले अटक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मे**

औंढा नागनाथ तालुक्यातील जवळा बाजार येथे तरूणाच्या खून प्रकरणात फरार असलेल्या आरोपीला औंढा पोलिसांच्या पथकाने रविवारी भर उन्हात ऊसाच्या फाडाला वेढा देऊन अटक केली. यावेळी पोलिसांनी ड्रोनच्या सहाय्याने आरोपीचा ठिकाणा देखील काढला.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार औंढा नागनाथ तालुक्यातील जवळा बाजार येथील मनोहर साखरे वय २६ या तरूणाचा दगडाने ठेचून खून करण्यात आला होता. याप्रकरणी औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात कृष्णा सोनुने या तरूणाविरूध्द गुन्हा दाखल झाला होता. मात्र घटना घडल्यानंतर कृष्णा हा फरार झाला होता.

दरम्यान पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन, उपअधीक्षक राजकुमार केंद्रे, गुन्हे शाखेचे पोनि मोहन भोसले, पोनि जी एस राहीरे यांचय पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली होती. या प्रकरणातील फरार आरोपीचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर होते. आरोपीच्या शोधासाठी पोलिसांनी सपोनि कैलास भगत, उपनि दत्ता कानगुले, उपनि माधव जिव्हारे यांचे पथक स्थापन केले. या पथकाने रविवारी दुपारी आरोपी कृष्णा हा जवळा बाजार शिवारातील एका शेतातील ऊसाच्या फडात लपल्याची माहीती मिळाली. पोलिसांनी भर उन्हात ऊसाच्या फडाला वेढा दिला. ड्रोनच्या सहाय्याने आरोपीचा नेमका ठिकाणा कळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकून अटक केली. दोन दिवसांपासून पोलिसांना हुलकावणी देणारा कृष्णा अखेर पोलिसांच्या तावडीत सापडल्यानंतर त्याची अधिक चौकशी केली असता त्याने खुनाचे कुठलेही कारण नसल्याचे सांगितले. दोन दिवस स्लॅबचे काम केल्यानंतर अठराशे रूपये मिळाले होते. या पैशातून मनोहर सोबत दारू पिली त्यानंतर हा प्रकार घडल्याचे त्याने सांगितले आहे.

## 50,000 कामगारांसाठी वातानुकूलित निवासस्थान

छत्रपती संभाजीनगर : : अदाणी ग्रुपचे चेअरमन गौतम अदाणी यांनी आंतरराष्ट्रीय कामगार दिनाच्या निमित्ताने ग्रुपच्या भविष्यातील धोरणाबद्दल माहिती दिली. त्यांनी सांगितले की आता कंपनी आपली प्रगती फक्त प्रोजेक्ट्स किंवा मालमत्तेवर मोजणार नाही, तर लोकांच्या जीवनावर होणाऱ्या परिणामावरही मोजणार आहे.

## जेईई मेन २०२६ मध्ये फारच उत्तम कामगिरी

मुंबई - महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी जेईई मेन २०२६ मध्ये फारच उत्तम कामगिरी केली आहे. राज्यातून वेदांतुचे १५५ विद्यार्थी जेईई अॅडव्हान्स २०२६ साठी पात्र ठरले आहेत. यामुळे एकूण २२०० वेदांतु विद्यार्थी आता पुढील टप्प्यासाठी तयारी करतील, वेदांतुचे सहसंस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी वामसी कृष्णा म्हणाले,: "महाराष्ट्राने कायमच दमदार शैक्षणिक महत्वाकांक्षा जपली आहे आणि यंदाचे निकाल हीच वृत्ती प्रतित करतात. आम्ही पुणे, नागपूर, अहिल्यानगर आणि जळगाव येथे सुरुवात करत असताना आमचा मुख्य भर राज्यभरातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाची शिकवणी आणि सखोल वैयक्तिक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यावर आहे."

## अंबुजा सिमेंट्सचा दमदार वार्षिक आणि तिमाही कामगिरीचा विक्रम

छत्रपती संभजीनगर: अंबुजा सिमेंट्स लिमिटेडने आर्थिक वर्ष 2025-26 आणि चौथ्या तिमाहीत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली असून कंपनीने इतिहासातील सर्वाधिक वार्षिक विक्री 73.7 दशलक्ष टन गाठली आहे. कंपनीचा एकूण महसूल ₹40,656 कोटींवर पोहोचला असून ईबीआईटीडीए ₹6,539 कोटी इतका नोंदवण्यात आला आहे, जो वर्षानुवर्षे 31% वाढ दर्शवतो. चौथ्या तिमाहीतही कंपनीने उत्कृष्ट कामगिरी करत 19.9 एमएनटीविक्री नोंदवली, जी आतापर्यंतची सर्वाधिक तिमाही विक्री आहे. या कालावधीत महसूल ₹10,915 कोटींवर पोहोचला असून ऑपरेटिंगईबीआईटीडीए ₹1,464 कोटी इतका राहिला. वाढत्या प्रीमियम उत्पादनांच्या विक्रीमुळे आणि मजबूत वितरण व्यवस्थेमुळे कंपनीला ही वाढ साध्य करता आली.

## लोकशाही दिनी 31 तक्रारी अर्ज प्राप्त

**छत्रपती संभाजीनगर** | दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजीत केला जातो. सोमवार दि.4 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात लोकशाही दिन आयोजीत करण्यात आला. यावेळी तब्बल 31 तक्रारी अर्ज प्राप्त झाले. त्याचा विभागनिहाय तपशिल याप्रमाणे- जिल्हा परिषद - 2, महसूल विभाग- 10, कृषी विभाग- 1 व इतर साधे निवेदन 18 असे एकून 31 अर्ज प्राप्त झाले, असे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सामान्य प्रशासन विभागाने कळविले आहे.

## घरी येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना माहिती द्या- सरिता चौधरी

**छत्रपती संभाजीनगर** | जिल्ह्यात मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाला वेग आला असून आपल्या घरी येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना योग्य ती माहिती द्यावी,असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती सरिता चौधरी यांनी केले आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी (दि.३०) रोजी आढावा बैठक पार पडली. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येणाऱ्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मतदार मॅपिंगच्या कामाला गती मिळाली असून ३० एप्रिल २०२६ पर्यंत ३२,४७,०९४ मतदारांपैकी २४,१६,६१८ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. जिल्ह्याची एकूण प्रगती ७४.४२ टक्के इतकी नोंदविण्यात आली आहे.

शहरी भागातील मतदारसंघांमध्ये मॅपिंगचे प्रमाण तुलनेने कमी असून सध्या ते ५० ते ६० टक्क्यांच्या दरम्यान आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली १०५-फुलंब्री, १०७-औरंगाबाद मध्य, १०८-औरंगाबाद पश्चिम व १०९-औरंगाबाद पूर्व या चार विधानसभा मतदारसंघांमध्ये विशेष आढावा बैठक घेण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या बैठकीत संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) व पर्यवेक्षकांना कामाचा वेग वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या. १० मे २०२६ पर्यंत किमान ९० टक्के मॅपिंग पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच या प्रक्रियेत जनजागृती वाढविण्यासाठी लोकप्रतिनिधी, नगरसेवक आणि बूथ लेव्हल एजंट (BLA) यांचा सक्रिय सहभाग घेण्याचे निर्देश देण्यात आले. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत मतदार मॅपिंग हा महत्त्वाचा टप्पा मानला जात असून यामुळे मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि पारदर्शक होण्यास मदत होते. या प्रक्रियेमुळे स्थलांतरित, मृत किंवा अनुपलब्ध मतदारांची नोंद सुधारता येते, तसेच पात्र नागरिकांची नावे योग्य ठिकाणी समाविष्ट होतात. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) घरी आल्यास त्यांना आवश्यक माहिती सहकार्याने द्यावी आणि मतदार यादीत आपला तपशील तपासून मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करावी,असे निर्देश श्रीमती चौधरी यांनी दिले.

## अजिंठा घाटात एक ट्राला ट्रक एका दुसऱ्या गाडीला वाचवताना दरडीवर आदळला

**फर्दापूर** | फर्दापूर . छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात एक ट्राला ट्रक दरडीवर आदळला असुन संध्याकाळी घाटात ट्राफीक जाम सुरू झाली रविवार दहा वाजता जालना हुन सुरत लोखंडी रॉड घेऊन जाणारा एम एच 21 बी एच 9527 यांनी एका गाडीला वाचवताना तो स्वतः दरडीवर जाऊन आदळला असुन चालक किरकोळ जखमी हा ट्राला ट्रक एका बाजूला असल्याने परंतु संध्याकाळी ट्राफिक हळूहळू वाढल्यामुळे घाटात ट्राफीक जाम होत असल्याने हि ट्राफीक जाम दिड तास सध्या होती या मध्ये कोदळी हुन सुरगळी जाणारे लग्नाचे वऱ्हाड अटकले होते यामध्ये सर्वाच जाणारे येणारे काही करत होते परंतु नेहमी प्रमाणे छोट्या चारचाकी वाहने हे रस्त्यावर दोन्ही बाजूला गाड्या असल्याने समोराच्या गाडीला समोर येण्यासाठी जागा राहत नव्हती त्यामुळे पुन्हा ट्राफिक होत असल्याने फर्दापूर पोलीस स्टेशनचे कर्मचारी तात्काळ घाटात पोहोचले आणि एकतर्फी वाहतूक सुरळीत करण्यात आली.

# एमजीएममध्ये संगीतातून उलगडले अभिधम्माचे सार...

## एमजीएममध्ये शील-समाधी-प्रज्ञेची थाटात संगीत प्रस्तुती



छत्रपती संभाजीनगर, दि.४ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठातर्फे बुद्धपौर्णिमेनिमित्त रुक्मिणी सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या 'शील-समाधी-प्रज्ञा' या संगीत प्रस्तुतीने श्रोत्यांसमोर अभिधम्माचे सार उघडले. तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या धम्माचा केंद्रबिंदू असलेल्या विज्ञाननिष्ठ तत्त्वज्ञानाला संगीतातून वाट करून देत शील, समाधी आणि प्रज्ञेची सूत्रे भारतीय शास्त्रीय संगीतातील विविध राग आणि तालांच्या आधारे प्रथमच सादर करण्यात आली.

एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांच्या मार्गदर्शनात बुद्धपौर्णिमेनिमित्त प्रस्तुत कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात केले गेले होते. प्रज्ञावान संगीतकार डॉ.संजय मोहड यांनी या संगीत प्रस्तुतीची निर्मिती केली. या संगीत प्रस्तुतीमध्ये महाकवी वामनदादा कर्डक यांच्या निवडक गीतांचे तसेच डॉ.संजय मोहड यांच्याही काही गीतरचनांचे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये त्रिसरण पंचशील (राग भूप कल्याण, आठ पंथाचा (राग सोहनी), सारे मानव प्राणी (राग बिहाग), त्रिसरण उद्धारती (राग हंसध्वनी), गौतमा तुझी गोडी (राग मारू बिहाग), भीम गौतम फुले (राग यमन), गौतमाला स्मरा (राग पहाडी), पहा पहा रे (राग मेघ, भैरवी) इ. गीतांचे सुमधुर सादरीकरण करण्यात आले.

या सर्व गीतांचे संगीत व निरूपण डॉ. संजय मोहड यांनी केले. तसेच डॉ. मेधा लखपति, विद्या धनेधर, उत्कर्षा बोचरे, सलोनी जुंबडे यांनी गायन केले. अनुप कुलथे (व्हॉयोलिन), निरंजन भालेराव (बासरी), रोहन शेटे (तबला), बंकट बैरागी (पखवाज), राहुल जोशी (सहतालवाद्य) यांनी सर्व गीतांना पूरक अशी साथसंगत केली.

या कार्यक्रमात डॉ.मनोहर जिलठे यांचा गौरव करण्यात आला. डॉ.जिलठे यांनी आपले संपूर्ण आयुष्य धम्म व समाजाच्या चिंतन आणि लेखनात समर्पित केल्याबद्दल एमजीएमच्या वतीने कुलपती अंकुशराव कदम यांच्या हस्ते हा सत्कार सोहळा संपन्न झाला. सत्कारास उत्तर देताना एमजीएम विद्यापीठातर्फे केलेला हा सत्कार माझ्या आयुष्यात अत्यंत मौलिक घटना आहे असे सहृदय उद्गार डॉ. जिलठे यांनी याप्रसंगी व्यक्त केले. तद्वतच बुद्ध, धम्म आणि संगीताच्या नात्यावरही त्यांनी याप्रसंगी प्रकाश टाकला.

या मैफलीला एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशरावजी कदम, सौ. अनुराधा कदम यांच्या समवेत शहरातील संगीत प्रेमींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. स्कूल ऑफ फिल्म आर्टचे विभागप्रमुख डॉ. शिव कदम यांनी मैफलीचे सूत्रसंचालन केले. संपूर्ण आयोजनाची जबाबदारी सामाजिक शास्त्रे विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके यांनी पार पाडली. श्रोत्यांनी अत्यंत शांतपणे या संगीत प्रस्तुतीचा आस्वाद घेऊन एमजीएम विद्यापीठाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली.

## भाजप युवा मोर्चातर्फे श्रमिकांचा सन्मान




**तभा वृत्तसेवा**

पैठण दि ०५ :- भारतीय जनता युवा मोर्चा (विहामांडवा मंडळ) पैठण तालुक्याच्या वतीने 'आंतरराष्ट्रीय कामगार दिना'चे औचित्य साधून परिसरातील विविध क्षेत्रांतील कष्टकऱ्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. समाजाच्या प्रगतीत मोलाचे योगदान देणाऱ्या हातांना सन्मानित करण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमांतर्गत पैठण तालुक्यातील विटभट्टी कामगार, कापड दुकान कामगार, गटई कामगार आणि हॉटेल क्षेत्रातील कामगारांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमासाठी भाजप युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष प्रशांत आव्हाड यांच्यासह भाजपचे सरचिटणीस विलास संत आणि सतीश आहेर यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी युवा मोर्चाचे पदाधिकारी राहुल धायगुडे, सचिन भाग्यवंत, ऋषिकेश काळे, युवराज भाकरे, रौनक मुळे, विष्णू बोबडे, यश चव्हाण, ओंकार नवपुते आदी कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवून कामगारांशी संवाद साधला.

## अशोक हिलाल पाटील यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**



कन्नड :- कन्नड : दि.०४ मे - शहरातील दत्त कॉलनी येथील रहिवासी अशोक हिलाल पाटील यांचे दि. ०४ सोमवार रोजी सकाळी सुमारे ७ वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने कन्नड शहरासह संपूर्ण तालुक्यावर शोककळा पसरली आहे.

ते शिक्षक व पत्रकार सागर पाटील यांचे वडील होत. समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहात अधीक्षक या पदावर त्यांनी दीर्घकाळ प्रामाणिक सेवा बजावली होती. सेवाकाळात त्यांनी अनेक विद्यार्थ्यांचे जीवन घडवण्याचे काम केले. अत्यंत मनमिळावू, साधे आणि मदतीस तत्पर असा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाशी त्यांचे आत्मीय नाते निर्माण झाले होते. त्यांच्या अचानक जाण्याने अनेकांनी एक आपुलकीचा माणूस गमावला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर संध्याकाळी साडेपाच वाजता देवलोक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# जलसंधारणाची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करा-जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.

**छत्रपती संभाजीनगर** | जिल्ह्यात मृद व जलसंधारणाची कामे वेळत व पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावी. त्यासाठी तालुकास्तरीय यंत्रणेने समन्वय राखून कामे करावीत असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज दिले.

जलयुक्त शिवार २.० अंतर्गत आज जिल्ह्यातील जलसंधारण कामांचा आढावा घेण्यात आला. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना अशा विविध जलसंधारण उपचार उपाययोजना राबविणाऱ्या यंत्रणांचा आढावा घेण्यात आला.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मित्रू पी.एम., उपवनसंरक्षक श्रीमती सुवर्णा माने, जिल्हा जलसंधारण अधिकारी नरेंद्र कटके, जिल्हा जलसंधारण अधिकारी (जि.प.) कपिल बिडकर, वरिष्ठ भू वैज्ञानिक जीवन बेडवाल तसेच तालुकास्तरावरील अधिकारी दुरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

### गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवारची ११९ कामे पूर्ण

सन २०२५-२६ या वर्षात गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत धरणांतील व जलसाठ्यांमधील गाळ काढण्याच्या २०० कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यापैकी ११९ कामे पूर्ण झाली आहेत, अशी माहिती यावेळी देण्यात आली. सुमारे २०.९५ लाख घनमीटर गाळ काढून १८७१ शेतकऱ्यांच्या शेतात पसरविण्यात आला असून त्याची किंमत सुमारे १३ कोटी ११ लाख रुपये इतकी आहे.



या योजनेमुळे पाझर तलावांची साठवण क्षमता वाढली असून शेतीला सुपिक गाळाचा मोठा फायदा होत आहे.

### ४८ नाल्यांच्या खोलीकरणाचा प्रस्ताव

सन २०२६-२७ साठी ४८ नाल्यांच्या खोलीकरणाचे प्रस्ताव तयार असून सुमारे ७.५० लाख घनमीटर गाळ काढण्याचे नियोजन आहे. यासाठी अंदाजे ३ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे,अशी माहिती यावेळी देण्यात आली.


### जलयुक्त शिवार अभियान २.० चा आढावा

जिल्ह्यात एकूण ३५२१ कामे मूळ गाव आराखड्यानुसार मंजूर होती, तर सुधारित आराखड्यानुसार २७२८ कामे मंजूर आहेत. मृद व जलसंधारण, कृषी, वन, जिल्हा परिषद आणि भूजल विभाग या विभागांमार्फत ही कामे करण्यात येत आहेत. विशेष निधी अंतर्गत १९६९ कामांना मान्यता देण्यात आली असून त्यापैकी १६८६ कामे पूर्ण झाली आहेत. विभागांच्या अभिसरणाच्या माध्यमातून ६१० कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. प्रलंबित कामांच्या सद्यस्थितीचा विभागनिहाय आढावा यावेळी घेण्यात आला.

### प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेची कामे ६२ गावांमध्ये

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत जिल्ह्यात ५० ग्रामपंचायतीत ६२ गावांमध्ये ५२ सुक्ष्म सिंचनासाठी जलोपचार कामे सुरु आहेत. त्यासाठी ४९ कोटी ४ लक्ष रुपयांचा निधी खर्च होणार आहे. २२ हजार २९३ हेक्टर क्षेत्राला याचा लाभ होणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली. येत्या पावसाळ्याच्या आत प्रलंबित कामे पूर्ण करावी. त्यासाठी तालुकास्तरीय यंत्रणेने परस्पर समन्वय राखावा. नाला खोलीकरणाच्या कामांवर भर द्या. येत्या पावसाळ्यात अधिकाधिक जलसंधारण होऊ शकेल यादृष्टीने कामांची गती वाढवावी,असे निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी यावेळी दिले.

# देवगाव रंगारी चमकले! श्री गणेश कनिष्ठ महाविद्यालयाचा १००% निकाल



**तभा वृत्तसेवा**

कन्नड :- दि.०४ मे - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वीच्या परीक्षेत श्री गणेश शिक्षण संस्था संचलित श्री गणेश कनिष्ठ महाविद्यालय, देवगाव रंगारी येथील विद्यार्थ्यांनी यंदाही उल्लेखनीय यश संपादन करत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध शाखांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत आपली गुणवत्ता सिद्ध केली.

विज्ञान शाखेतून पार्थ राजेंद्र नेवगे याने ८१.००% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. सौम्या ललितकुमार पापडीवाल (७८.५०%) हिने द्वितीय, तर श्रेया नितीनकुमार पापडीवाल (७७.५०%) हिने तृतीय क्रमांक मिळवला.

वाणिज्य शाखेत हर्षवर्धन जालिंदर वाघ याने ७९.३३% गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. ऋतुजा संजय क्षीरसागर (७६.८३%) व निकिता भारत सोनावणे (७४.५०%) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय स्थान पटकावले.

कला शाखेत अल्फाज अयाज कुरेशी याने ७५.५०% गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. अमरसिंग शक्तीसिंग घुनावत (७१.००%) द्वितीय, तर सुमय्या निसार बेग (७०.८३%) हिने तृतीय क्रमांक मिळवला.

महाविद्यालयाच्या या यशामागे शिस्तबद्ध अभ्यासपद्धती, डिजिटल अध्यापन आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन हे प्रमुख घटक असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देत महाविद्यालयाने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रकाश भांडवलदार, सचिव एल. डी. भांडवलदार, शालेय समितीचे अध्यक्ष सुभाषराव भांडवलदार, प्राचार्य आर. एस. पांडे, उपप्राचार्य तसेच सर्व शिक्षकांनी

## कलर्स मराठीवरील BIGG BOSS मराठी सिझन 6 चा फिनाले ठरला रेकॉर्ड ब्रेकिंग!

छत्रपती संभाजी नगर : कलर्स मराठीवरील 'बिग बॉस मराठी सिझन ६' ने केवळ प्रेक्षकांची मनेच जिंकली नाहीत, तर रेटिंगच्या शर्यतीतही सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. नुकत्याच पार पडलेल्या या पर्वाच्या महाअंतिम सोहळ्याने ३.१ TVR चा टप्पा गाठत यावर्षीच्या सर्व मराठी रिॲलिटी शोचे रेकॉर्ड्स उद्धस्त केले आहेत. या अभूतपूर्व प्रतिसादाने बिग बॉस मराठी पुन्हा एकदा महाराष्ट्राचा नंबर १ रिॲलिटी शो ठरला असून, अनमॅच्ड (Unmatched) नंबर्ससह हा या वर्षातील सर्वात मोठा आणि यशस्वी ग्रँड फिनाले ठरला आहे.

या भव्य सोहळ्यात तन्वी कोलतेने आपल्या दमदार आणि सातत्यपूर्ण खेळाच्या जोरावर 'महाविजेती' पदावर मोहोर उमटवली. हा ग्रँड फिनाले केवळ निकालामुळेच नाही, तर स्पर्धकांच्या एका पेक्षा एक धडाकेबाज परफॉर्मन्सेसमुळेही अविस्मरणीय ठरला. अंतिम फेरीतील सदस्यांनी सादर केलेली नृत्ये, रितेश देशमुख यांची अनोखी शैली आणि शंभर दिवसांच्या प्रवासातील आठवणींना दिलेला उजाळा यामुळे प्रेक्षक टीव्ही स्क्रीनला खिळवून राहिले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मिळालेल्या उदंड प्रतिसादामुळे या सोहळ्याला एका उत्सवाचे स्वरूप आले होते, ज्याची सांगता तन्वी कोलतेच्या विजयाने आणि जल्लोषाने झाली. शेवटी, 'बिग बॉस मराठी सिझन ६' ने पुन्हा एकदा सिद्ध केले की मनोरंजनाच्या बाबतीत या शोची तुलना कोणाशीही होऊ शकत नाही. ३.१ TVR चे हे ऐतिहासिक रेटिंग प्रेक्षकांच्या अलोट प्रेमाची पावती आहे. तन्वी कोलतेने १५ लाखांची धनराशी आणि मानाची ट्रॉफी पटकावून इतिहास रचला असला, तरी खऱ्या अर्थाने या रेकॉर्ड ब्रेकिंग यशाने कलर्स मराठी वाहिनीने प्राईम टाइमवर आपले वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. भावना, जिद्द आणि चुरस असलेल्या या पर्वाची सांगता एका सोनेरी टप्प्यावर झाली आहे.

# शासकीय कर्करोग रुग्णालयाचा सेवा आणि उपचाराचा वाढता लौकीक

छत्रपती संभाजीनगर - केवळ मराठवाडा विभागातीलच नव्हे तर उत्तर महाराष्ट्र, विदर्भ भागातील कर्करोग रुग्णांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालयाने दर्जेदार व सुलभ उपचार देऊन लौकीक प्राप्त केला आहे. कर्करोगाशी झुंजणाऱ्या रुग्णांना हे रुग्णालय म्हणजे आशेचा किरण होय. स्थापनेपासून आजपर्यंत लाखो रुग्णांना सेवा देऊन या रुग्णालयाने अनेकांच्या जीवनात आनंद निर्माण केला आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे व शासकीय कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड यांच्या कुशल नियोजन आणि प्रशासनामुळे येथील सेवांचा दर्जा उंचावला असून रुग्ण बरे होऊन हसऱ्या चेहऱ्याने आपल्या कुटूंबात परत जातात हा त्यांच्या समाधानाचा क्षण असल्याचे डॉ. सुक्रे व डॉ. गायकवाड सांगतात.

कर्करोग आणि त्यावर मात करण्यासाठी रुग्णाला द्यावी लागणारी झूंज ही केवळ रुग्ण आणि आजार यांच्यातील झूंज नसून त्यात उपचार करणाऱ्या वैद्यकीय पथकाचे योगदान मोठे असते. ते योगदान शासकीय कर्करोग रुग्णालय समर्थपणे देत आहे.

रुग्णालय स्थापना व विस्तार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,छत्रपती संभाजीनगर ( पूर्वीचे औरंगाबाद ) येथे सन १९८४ मध्ये किरणोपचार विभागाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर राज्य शासनाच्या पुढाकारातून या रुग्णालयाचा सातत्याने विस्तार होत आज ते अत्याधुनिक सुविधा असलेले महत्त्वाचे कर्करोग उपचार केंद्र बनले आहे. सन २००८ मध्ये महाराष्ट्र शासनाने या रुग्णालयाला मान्यता देत बांधकामास सुरुवात केली. यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. पुढे सन २०११ मध्ये शासन निर्णयानुसार वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व प्रशासकीय कर्मचाऱ्यांची ३५९ पदे मंजूर करण्यात आली. दि. २१ सप्टेंबर २०१२ रोजी रुग्णालयाचा अधिकृत शुभारंभ झाला. येथे पॅथॉलॉजी, मायक्रोबायोलॉजी, बायोकेमिस्ट्री, रेडिओ डायग्नोसिस यांसह १०० खाटांची व्यवस्था, ४ शस्त्रक्रिया कक्ष, किमोथेरपी व किरणोपचार सुविधा सुरू करण्यात आल्या. सिटी सिम्युलेटर, ब्रॅकीथेरपी व लीनियर ॲक्सिलरेटर यांसारखी आधुनिक यंत्रसामग्रीही उपलब्ध झाली.

सन २०१५ मध्ये टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई यांच्याशी डॉ.कैलास शर्मा, शैक्षणीक संचालक, टाटा रुग्णालय, मुंबई यांच्या समन्वयाने सामंजस्य करार करण्यात आला. या अंतर्गत टाटा रुग्णालय मुंबईद्वारे भाभाट्रॉन-II यंत्र देण्यात आले, ज्यामुळे उपचाराची प्रतीक्षा कमी झाली आणि मुंबईकडे जाणाऱ्या रुग्णांची संख्या घटली.

### जाहीर प्रगटन

**मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे.व्ही.डी. पाटील साहेब) क.स्तर यांचे कोर्टात**

दि. किरकोळ अर्ज क. 192/2026

अर्जदार :- 1. श्री. भगवान पि. काशिनाथ गायसमिंदर वय-68 धंदा-शेती 2. श्री. मिलींद पि. काशिनाथ गायसमिंदर वय-53 धंदा-शेती 3. श्री. सुभाष पि. काशिनाथ गायसमिंदर वय-48 धंदा-शेती 4. अनिल पि. सुरेश गायसमिंदर वय-36 धंदा-शेती सर्व रा. टाकळी (अं.) ता. कन्नड जि. औरंगाबाद 5. मिराबाई भ्र. दिलीप जमधडे (मिराबाई पि. काशिनाथ गायसमिंदर) वय 54 धंदा-घरकाम रा. रमानगर कांतीचौक औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद 6. आशाबाई भ्र. सिद्धेश्वर जमधडे (आशाबाई पि. काशिनाथ गायसमिंदर) वय-45 धंदा-घरकाम रा. गल्ली नं. 1 कर्मवीर शंकरसिंग नाईक शाळेजवळ माहुनगर नविन बालाजीनगर औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद 7. रेखा भ्र. सांडु साबळे (रखा पि. काशिनाथ गायसमिंदर) वय-37 धंदा-घरकाम रा. मोढा बु. ता. - सिल्लोड जि. औरंगाबाद

- विरुद्ध :-

गैरअर्जदार - कोणीही नाही

अर्जः- बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट 1827 चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत...

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या मा. न्यायालयात अॅड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. 1 ते 3 व 5 ते 7 यांचे वडील व अर्जदार क. 4 यांचे आजोबा मयत नामे काशिनाथ पि. रावकाजी गायसमिंदर यांचा मृत्यु दि. 29/04/2003 रोजी भौजे टाकळी अं. ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसुन मयताची पत्नी व अर्जदार क. 1 ते 3 व 5 ते 7 यांची आई व अर्जदार क. 4 ची आजी मयत नामे शांताबाई भ्र. काशिनाथ गायसमिंदर हि दि. 01/01/2009 रोजी मयत झाली आसुन मयताची आई नामे तुळसाबाई भ्र.रावकाजी गायसमिंदर हिचा मृत्यु दि. 10/01/1975 रोजी मौजे टाकळी अं. ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून आजमितीस मयतास केवळ अर्जदार क. 1 ते 7 हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत काशिनाथ पि. रावकाजी गायसमिंदर यांचे शासकीय, निमशासकीय योजनेंचा लाभ अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहू जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, मयत काशिनाथ पि. रावकाजी गायसमिंदर यांचे अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय, कामासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन 30 दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप ग्ग्रहय धरला जाणार नाही. करीता आज दि. 04/05/2026 रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्कयानिशी दिले आहे.

आदेशावरून

क. लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड

### मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 320/2025.

अर्जदारः- 1) कासाबाई तेजराव गावंडे, वयः 73 वर्षे, धंदाः घरकाम. रा. पोखरी ता. भोकरदन जि. जालना. 2) सुनील तेजराव गावंडे, वयः 51 वर्षे, धंदाः निरंक, रा. सी-60-1, ए सेक्टर, शिवाजी नगर, 11 वी 12 वी योजना सीडको, औरंगाबाद ता. व जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). 3) छाया अर्जुन बडक, वयः 45 वर्षे, धंदाः घरकाम, रा. प्लॉट नं. सी-60/1, 11 वी योजना, शिवाजी नगर, क्रांती चौक, औरंगाबाद ता. व जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). 4) अंजली प्रकाश सपकाळ, वयः 40 वर्षे, चंदाः घरकाम, रा. एन 09, एच. 119/3, सिडको, श्रीक्रीष्णा नगर, औरंगाबाद ता. व जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

// विरुध्द //

गैरअर्जदारः-निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अॅड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे तेजराव रामा उर्फ रामराव गावंडे ह्या दिनांकः-23/04/2018 ला मौजे औरंगाबाद जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. (पुढील दिनांकः 07/05/2026).

तरी ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीतों उजरे अंगर आंक्षेपं अरोलें त्योनी है जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः- 04/05/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले

विभागीय लिपीक, | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगाव

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापूर जि औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.२८७/२०२६

उज्वला काशिनाथ दिवेकर व इतर

विरुध्द

निरंक

प्रकरण. :- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे पिता नामे काशिनाथ लक्ष्मण दिवेकर हे दि.०५/१०/२०२४ रोजी मौजे सिध्दनाथवाडगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन अर्जदार नं. १) उज्वला काशिनाथ दिवेकर, २) छकुली काशिनाथ दिवेकर, ३) मंगेश काशिनाथ दिवेकर, अर्जदार नं २ व ३ यांची अ.पा.क. आई/अर्जदार नं. १ सर्व रा. सिध्दनाथ वाडगाव, ता. गंगापुर जि.औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अॅड.श्री.बी.पी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ३ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.३०/०४/२०२६.

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर